https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –३३३ मंगळवार दि.११ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-333 Tuesday, Dt.11 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

● अल्पवयीन मुलीचे फोटो काढून विनयभंग केल्या प्रकरणी तथाकथित ●

# राष्ट्रीय खो खो खेळाडू तुकाराम करांडेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल..!




## बीडच्या नवगण कॉलेजसमोरील फोटो स्टुडिओमध्ये प्रकार, फोटो सोशल मीडियावर टाकण्याची धमकी दिल्याची तक्रार..!!

बीड /प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीचे फोटो काढून ते तिच्या मोबाईलवर पाठवत, फोटो सोशल मीडियावर टाकण्याची धमकी देऊन मानसिक त्रास दिल्याच्या आरोपावरून तथाकथित राष्ट्रीय खो खो खेळाडू तुकाराम करांडे सहित राहुल राठोड आणि धनराज भगलाने यांच्यासह एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे क्रीडा क्षेत्रासह बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडे दाखल तक्रारीनुसार, दि. १ मार्च २०२४ ते ९ जुलै २०२६ या कालावधीत संबंधित प्रकार घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. नवगण कॉलेज, बीडसमोरील एका फोटो स्टुडिओमध्ये संबंधित अल्पवयीन मुलीला नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध फोटो काढण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, तुकाराम करांडे याने फिर्यादीच्या डोक्याला पिस्तूल लावून, फोटो काढण्यास विरोध केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिल्याचा आरोप आहे. तसेच काढलेले फोटो फिर्यादीच्या मोबाईलवर पाठवून ते फोटो इतरांकडे पाठविण्याची तसेच सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्याची धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणात तुकाराम करांडे (वय २८, रा. स्वराजनगर, बीड), राहुल राठोड (वय २२, रा. माजलगाव) आणि धनराज भगलाने (वय २४, रा. बीड) तसेच त्यांचा एक अनोळखी मित्र यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी उपलब्ध कागदपत्रानुसार भारतीय न्याय संहितेतील कलम ७८, १२, ७९, ७७, ७४, ७८, ३५१(२), ३(५) तसेच संबंधित कलम ३/२५ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### बीड येथे झालेल्या राष्ट्रीय खो खो स्पर्धा वादाच्या भवऱ्यात अडकणार..?

● काही दिवसापूर्वीच बीड येथे राष्ट्रीय खो–खो स्पर्धा झाल्या होत्या. या स्पर्धे करता तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांची दिशाभूल करून डीपीडीसीच्या निधीमधून तब्बल ३५ लाख रुपये उचलण्यात आले असल्याचे समजते. आणि या स्पर्धेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार तसेच चुकीच्या खेळाडूंना राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचवण्याचे काम बेकायदेशीरपणे झाले. हेच करांडे यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्यातून सिद्ध होत आहे. त्यामुळे करांडेला पाठबळ देणाऱ्या यंत्रणा समोर येणे आणि त्यांच्यावर सुद्धा कारवाई होणे गरजेचे आहे.

### धमकीच्या प्रकाराने खळबळ

● अल्पवयीन मुलींचे फोटो किंवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर करून त्यांना धमकावण्याचे प्रकार गंभीर असून, अशा प्रकरणांत पोलिसांकडून कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. या प्रकरणातील आरोपींवर पुढील तपासात आणखी काही बाबी समोर येतात का, याकडे लक्ष लागले आहे.

### ■ कराटेच्या अवघ्या काही दिवसांपूर्वीच गावठी कट्टा जिवंत काडतुसासह बाळगल्याप्रकरणी मुस्क्या आवळल्या होत्या...

स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमने अवैध गावठी कट्टा घेऊन फिरणाऱ्या तथाकथीत तुकाराम करांडे यांच्या मुस्क्या आवळून त्याच्याकडून गावठी कट्टा आणि जिवंत काढतोस जप्त केले होते याप्रकरणी गुन्हा दाखल करून पोलिसांनी पाठक केले होते या घटनेने खळबळ उडालेले असतानाच संबंधित आरोपीने आपल्या वकिलाच्या माध्यमातून न्यायालयासमोर दिशाभूल करणारी माहिती देत जामीन मिळवला होता जामिनावर सुटका होत नाही तोच अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणी गुन्हा दाखल झाल्याने क्रीडा क्षेत्रामध्ये खळबळ उडाली आहे या करांडेला राष्ट्रीय पातळीपर्यंत खेळाडू म्हणून घेऊन जाण्यामध्ये बेकायदेशीर रित्या कोणाचा हात आहे त्यामागे नेमका संबंधितांचा काय हेतू होता हे देखील समोर येणे गरजेचे आहे.

# माहिती अधिकारीपदी संजीवनी जाधव–पाटील रुजू



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी या पदावर श्रीमती संजीवनी जाधव–पाटील नुकत्याच रूजू झाल्या.

जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने व अन्य कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. मूळच्या छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असणाऱ्या श्रीमती जाधव यांनी या पूर्वी उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे उपसंपादक, त्यानंतर विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, विभागीय माहिती कार्यालय , कोकण भवन नवी मुंबई येथे सहायक संचालक म्हणून कार्य केले आहे.

श्रीमती जाधव–पाटील यांनी पत्रकारितेत बी.जे., एम.जे. तसेच एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. प्रशासनात येण्यापूर्वी दै. लोकपत्रमध्ये उपसंपादक म्हणून कार्य केले आहे. तसेच आकाशवाणी केंद्रात प्रादेशिक वृत्तनिवेदिका आणि एमसीएन (माध्यम) वृत्तवाहिनीमध्ये निवेदिका म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

# विभागीय माहिती कार्यालयात सहाय्यक संचालकपदी सुरेश पाटील रुजू





छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय माहिती कार्यालयातील सहाय्यक संचालक (वर्ग–२, राजपत्रित) पदावर सुरेश पाटील रुजू झाले. उपसंचालक प्रवीण टाके यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.विद्यमान सहाय्यक संचालक गणेश फुंदे यांची जिल्हा माहिती अधिकारी, पुणे येथे बदली झाल्याने रिक्त झालेल्या पदावर पाटील यांनी फुंदे यांच्याकडून पदभार स्वीकारला.उपसंचालक प्रवीण टाके यांच्या मार्गदर्शनात ते काम करणार आहेत.

सहाय्यक संचालकपदी रुजू होण्यापूर्वी पाटील हे शिर्डी येथे माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. या सेवाकाळात त्यांनी जळगाव आणि अहिल्यानगर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभारही सांभाळला.सुरेश पाटील यांनी पत्रकारितेतील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. दैनिक सकाळ, पुढारी आणि सायं दैनिक लोकमान्य सांजवर्ता या वृत्तपत्रांमध्ये त्यांनी बातमीदारी केली आहे.याशिवाय प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक यांच्या कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होते.छत्रपती संभाजीनगर विभागातील वृत्त व माहितीसाठी त्यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ७०२८५८६९१९ वर संपर्क साधता येईल.

# बुलेटच्या कर्णकर्णशः सायलन्सरला जिल्हा वाहतूक शाखेचा लगाम

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर जिल्हा पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्या सुचनेवरुन तसेच जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी वैभव पाटील आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश नरवडे तसेच पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली काल दि.९ ऑगस्ट २०२६ रोजी बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स, सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स येथे १७.०० ते १९.०० वाजण्याच्या दरम्यान कर्णकर्णश आवाजाच्या नागरिकांना त्रास होत असलेल्या १३ बुलेट चालकांच्या वाहनावर सायलेन्स जप्त करुन कारवाई करण्यात आली. यावेळी पोलीस हवालदार अजिनाथ मुंडे, त्रिंबक कुडके, गणेश तळेकर, पोलीस नाईक सचिन सारणीकर, पोलीस अंमलदार संतोष मोरे, वसीम शेख, संजय टुले,

पान २ वर...



### वाहतुकीचे नियम पाळा अन्यथा कारवाई अटळ

यापुढे कोणीही बुलेट सायलेन्सर मोडीफाय करुन नागरिकांना त्रास होईल असे वाहन रस्त्यावर चालवणार नाही तसेच ध्वनीप्रदुषण करणार नाही याची काळजी घ्यावी अन्यथा साउंड पोल्युशन कायद्यानुसार आणि इनव्हायरमेंट प्रोटेक्शन अ‍ॅक्ट कायदा १९८६ प्रमाणे गुन्हे नोंद करून वाहन विनापरवाना मॉडीफाय केल्याबाबत जबर दंड वसूल करण्यात येईल. त्यामुळे वाहतुकीचे नियम पाळावे असे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी वैभव पाटील यांनी कळविले आहे.

# परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या भूमीपूजन तारखेत बदल

### भूमीपूजन आता १४ ऐवजी १५ ऑगस्टला

मुंबई । प्रतिनिधी

५६५ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीच्या भूमीपूजन कार्यक्रमाच्या तारखेत बदल झाला असून आता हे भूमीपूजन १४ ऐवजी १५ ऑगस्ट रोजी होणार आहे अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

१५ ऑगस्ट रोजी दुपारी २ वा. उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते आणि पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण पोलीस ठाण्याजवळ असलेल्या टेकडीवरील मैदानात हा भूमीपूजन कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाची प्रशासनाकडून सध्या तयारी सुरू झाली आहे.

बीड येथे शासकीय ध्वजारोहण झाल्यानंतर उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि जालना येथील ध्वजारोहण आटोपून ना. पंकजाताई मुंडे परळीत येणार आहेत. प्रशासनाने तारखेतील बदलाची नोंद घेत कार्यक्रमाची तयारी सुरू केली आहे.

# शेकडो शेतकरी, शेतमजूर,कामगारांना अटक व सुटका दखल न घेतल्यास कृषि मंत्र्याच्या घरावर धडकणार

परळी / प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी, शेतमजूर आणि कामगार विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी तसेच प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी सीटू (उखढण), शेतमजूर युनियन आणि अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने जिल्ह्यात जोरदार 'जेलभरो' आंदोलन करण्यात आले. परळी



तालुक्यातील सिरसाळा या ठिकाणी या आंदोलनात शेकडो श्रमिक सहभागी झाले.

शेतकऱ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेला १७५०० रुपयांचा पीक विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, पीक विमा योजनेतील शेतकरी हिताचे ट्रिगर

पान २ वर...

# संघटन मजबूत करण्यासाठी शिवसेना कार्यकर्त्यांना निश्चित बळ देणार -आशिष जैस्वाल




### बदनापूर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची संवाद व आढावा बैठक उत्साहात बूथनिहाय संघटन मजबूत करण्यावर भर

बदनापूर । प्रतिनिधी

ता. ७ जालना जिल्ह्यासह बदनापूर विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांना निश्चित बळ दिले जाईल. गाव, वाडी–वस्तीपासून बूथ पातळीपर्यंत संघटना सक्षम करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून सातत्याने जनसंपर्क वाढवावा असे आवाहन राज्याचे राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष जैस्वाल यांनी केले.

बदनापूर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात गुरुवारी ता. ६ बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची संवाद व आढावा बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीस राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष जैस्वाल, शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय....

# 'यूपीआय' सशुल्क होणार ?

अतिशय लोकप्रिय बनलेले युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) प्रणालीद्वारे होणा-या व्यवहारांवर प्रक्रिया शुल्क आकारणीच्या (मर्चंट डिस्काऊंट रेट- 'एमडीआर') दिशेने केंद्र सरकारने पाऊल टाकले आहे असे दिसते. या संदर्भात सरकारने मांडलेले कर दुरुस्ती विधेयक गुरुवारी लोकसभेत प्रचंड गदारोळात मंजूर झाले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम कायदा दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडले. या विधेयकाला चर्चेविना आवाजी मतदानाने मंजुरी देण्यात आली. ऑनलाईन व्यवहारांवर सेवा पुरवठादार बँका आणि देयक कंपन्यांना शुल्क आकारणी करण्यास असलेली मनाईची तरतूद या विधेयकाद्वारे रद्द करण्यात आली आहे. आरटीजीएस आणि एनईएफटी व्यवहारांवर सध्या शुल्क आकारणी केली जाते. मात्र, यूपीआय आणि रुपे कार्ड व्यवहारांवर सध्या शुल्क आकारणी केली जात नाही. मंजूर विधेयकामुळे या व्यवहारांवर शुल्क आकारणीची वाट आता मोकळी झाली आहे.

प्रक्रिया शुल्क आकारणी करण्यासाठी या विधेयकामुळे सरकारला कायदेशीर बदल करता येणार आहे. ग्राहक आणि छोट्या व्यवसायांना डिजिटल व्यवहारांवर अल्प शुल्क आकारणी करून बँका आणि देयक सेवा पुरवठादार कंपन्यांना शाश्वत महसुलाचे साधन उपलब्ध करून देण्याचा सरकारचा यामागे हेतू आहे. डिजिटल देयक परिसंस्था चालविणा-या कंपन्यांनाही यातून महसुलाचा स्रोत उपलब्ध होणार आहे. यूपीआयच्या माध्यमातून जुलैमध्ये २३.६ अब्ज व्यवहार झाले असून, ते एकूण २९.९ लाख कोटी रुपयांचे आहेत. या कर आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक २०२६ चा मुख्य उद्देश देशात विदेशी गुंतवणुकीला गती देणे आणि 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला मोठे प्रोत्साहन देणे हा आहे. जागतिक पातळीवर बदलणा-या आर्थिक आणि पुरवठा साखळीच्या पार्श्वभूमीवर, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक वाढवून 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'ला चालना देण्याची सरकारची योजना आहे. यासाठी हे विधेयक प्राप्तिकर कायदा २०२५, वित्त कायदा तसेच 'पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम अ‍ॅक्ट', २००७ मध्ये आवश्यक बदल प्रस्तावित करते. या सुधारणांमुळे सर्वसामान्यांच्या थेट प्राप्तिकरात कोणताही बदल होणार नाही. मात्र, फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्सना (एफपीआय) सरकारी रोख्यांमधील गुंतवणुकीवरील व्याज आणि कॅपिटल गेन्सवर करात सवलत मिळण्याची शक्यता आहे. यामुळे देशात मोठा विदेशी निधी येऊन नवीन उद्योगांसोबतच रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. या विधेयकातील 'पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम्स अ‍ॅक्ट'च्या कलम १० ए मध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव ठेवला आहे.

सध्याच्या कायद्यानुसार बँका आणि पेमेंट सेवा पुरवठादार (पीएसपी) यांना यूपीआय आणि रुपे डेबिट कार्ड व्यवहारांवर एमडीआर आकारता येत नाही. प्रस्तावित दुरुस्तीनंतर ही कायमस्वरूपी सवलत हटवली जाईल.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५३३/२०२६**
**मल्हारी पि. सुखदेव माने व इतर वि. निरंक**
**(मार्फत - अ‍ॅड. एस.एस. ढोबळे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सुखदेव पि. शंकर माने, रा. महांडुळा ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक २१/०८/२००५ रोजी महांडुळा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ मल्हारी पि. सुखदेव माने, वय ४२ वर्षे, धंदा नोकरी, रा. महांडुळा ता. गेवराई जि.बीड ह.मु. बालमटाकळी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर अर्जदार क्र. २ इंदुबाई भ्र. सुखदेव माने, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. महांडुळा ता. गेवराई जि. बीड ह.मु. बालमटाकळी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सुखदेव पि. शंकर माने यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १५/०९/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

पान १ वरुन..

**बुलेटच्या कर्णकर्णशः .....**

तसेच शिवाजीनगर पो.स्टे.चे ग्रेड पीएसआय मच्छिंद्र राख, लिंबाजी महानोर, बीड शहरचे पोलीस अंमलदार सचिन वाघमारे, संतोष तांबे जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस अंमलदार अनिकेत घुले, पोलीस चालक दत्ता कदम इत्यादींनी सहभाग नोंदविला.

आपल्या बुलेट वाहनाला मोडीफाय सायलेन्सर बसवून शहरात ठोऽऽऽ ठो ऽऽऽ आवाज करुन नागरिकांना वेठीस धरणार्या वाहनधारकांनी यापुढे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करु नये असा इशारा जिल्हा वाहतुक शाखेने यावेळी दिला आहे.

**संघटन मजबूत करण्यासाठी....**

घुगे, संपर्कप्रमुख ए. जे. बोराडे यांच्यासह शिवसेना, युवासेना व विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्षभर जनतेच्या संपर्कात राहण्याचे आवाहन

मार्गदर्शन करताना आशिष जैस्वाल म्हणाले प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात पक्षाची भूमिका आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवावी. जनसंपर्क केवळ निवडणुकीपुरता मर्यादित न ठेवता वर्षभर जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मेहनतीवरच पक्षाची संघटना उभी असते. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवून संघटन विस्तारण्याला प्राधान्य द्यावे असे त्यांनी सांगितले.

शिवसेना कार्यकर्त्यांच्या पाठीशी वरिष्ठ नेतृत्व ठामपणे उभे राहील. कार्यकर्त्यांना आवश्यक ते बळ देण्यासाठी आपण निश्चितपणे पुढाकार घेऊ अशी ग्वाही जैस्वाल यांनी दिली. तूच आहेस तुझ्या भविष्याचा शिल्पकार हा प्रेरणादायी मंत्र देत कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने संघटनात्मक कामाला लागावे असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यकर्त्यांना योग्य सन्मान मिळावा

प्रास्ताविकात शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगितले. पक्षाचे संघटन विस्तारत असून कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह आहे. मात्र महायुतीच्या माध्यमातून आपण सत्तेत असताना विकासकामे व शासकीय योजनांच्या बाबतीत मित्रपक्षांतील काही लोकप्रतिनिधींकडून शिवसेना कार्यकर्त्यांना दुजाभावाची वागणूक मिळत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

शिवसेनेच्या वाढीसाठी कार्यकर्त्यांनी सातत्याने मेहनत घेतली आहे. त्यामुळे विकासकामे शासकीय योजना तसेच स्थानिक प्रश्नांच्या बाबतीत शिवसेना कार्यकर्त्यांना योग्य स्थान आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. वरिष्ठ नेतृत्वाने कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना बळ द्यावे अशी अपेक्षा घुगे यांनी व्यक्त केली.

बूथनिहाय संघटन मजबूत करण्याचा निर्धार

बैठकीत विविध पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील संघटनात्मक परिस्थितीचा आढावा मांडला. आगामी काळात बूथनिहाय संघटन मजबूत करणे नव्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या प्रवाहात आणणे जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविणे तसेच शासनाच्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे यावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी काकासाहेब महाराज खैरे, सुभाषराव बोडखे, युवासेना लोकसभा अध्यक्ष गणेश मोहिते, युवासेना जिल्हाध्यक्ष अमोल ठाकूर, अजय कदम, शेख जावेद, कैलास दुधानी, भास्करराव मगरे, कालींदाताई ढगे, छायाताई जराड, ईश्वर पाटील जुंबड, महादू गीते, नंदूभाऊ दाभाडे, कैलास चव्हाण, राजेंद्र चौधरी, कैलास वैद्य, दीपक दिघे, मनोज शिंदे, रामेश्वर नागवे, निवृत्ती डाके, सिताराम गोरे, रतनकुमार नाईक, हरिभाऊ कापसे, सखाराम शिरसागर, सय्यद इमरान, संभाजी गोरे, महेश रायकर, शिवाजी इंगळे, रुद्र घोगे, अनिल हिवराळे, अमोल दाभाडे, ऋषिकेश थोरात, राऊत पटेल, रामेश्वर नारायण ब्राह्मणे, भगवान ढाकणे, भगवान सावंत, जना बापू कोलते, राजू पाटील वायाळ, बाबासाहेब चंद, देवा ढाकणे, शेख मुनीर, सतीश चव्हाण, महेश सातपुते, दीपक खरात, रामेश्वर दराडे, विलास तुपे, गणपत केकान, विजय कठाळे यांच्यासह शिवसेना, युवासेना व विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शेकडो शेतकरी,....**

पूर्ववत लागू करावेत आणि नियमित कर्ज भरणार्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांचे प्रोत्साहनपर

पान १ वरुन..

अनुदान द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. यासोबतच भारत आणि अमेरिका यांच्यातील शेतकरी व कामगारांवर थेट प्रतिकूल परिणाम करणारा करार रद्द करावा, केंद्रातील व राज्यातील सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे सर्वसामान्यांचे प्रश्न बिकट झाले असून, खाजगीकरण व कंत्राटी पद्धतीमुळे बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. कॉर्पोरेट धार्जिण्या धोरणांमुळे कायमस्वरूपी नोकरीच्या संधी संपवल्या जात आहेत. या सरकारी धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करून प्रशासनाला मागण्यांचे सविस्तर निवेदन सुपूर्द केले.

या निवेदनाद्वारे नव्याने लादण्यात आलेल्या चारही कामगार संहिता तात्काळ रद्द करण्याची आणि असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा लागू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका आणि शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना कंत्राटी पद्धतीतून मुक्त करून त्यांना शासकीय सेवेत कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा आणि किमान ३० हजार रुपये वेतन लागू करावे, अशी मागणी मांडण्यात आली. रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून वर्षाला २०० दिवस काम, ऊसतोडणी व वाहतूक कामगारांचा २०२६-२९ या तीन वर्षांचा त्रिपक्षीय करार गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वीच तात्काळ करावा, लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी महामंडळाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी,

सक्तीचे 'स्मार्ट मीटर' बसवणे बंद करून वाढीव वीज बिल लोडनुसार दुरुस्त करावे आणि सिरसाळा येथील निवासी गायरान व भोगवटाधारकांना मालकी हक्काचा झढठ द्यावा, या मुद्द्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.शासनाने या सर्व रास्त मागण्यांची तात्काळ दखल घेऊन योग्य निर्णय न घेतल्यास कृषि मंत्र्यांच्या च्या घरा समोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल , असा थेट इशारा या वेळी किसान सभा, सिटू संघटना, शेतमजूर युनियन आदी संघटनांच्या कॉ.ऑड.अजय बुरांडे, कॉ.बी.जी.खाडे, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ.प्रकाश उजगरे, कॉ.भगवान बडे, कॉ.किरण सावजी, कॉ.रमेश पांचाळ, आशा वर्कर्स चाटे मॅडम, कॉ.पी.एस.नागरगोजे, कॉ.पी.एस.घाडगे, कॉ.पांडुरंग राठोड, कॉ.गंगाधर पोटभरे, कॉ.बळीराम देशमुख,कॉ.विष्णू देशमुख, कॉ.मदन वाघमारे आदी पदाधिकारी यांनी दिला.

**योग शिक्षकांच्या...**

योग शिक्षकांच्या प्रमुख मागण्या

सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये योग सत्रे नियमित सुरू ठेवण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत.प्रलंबित पुनर्नियुक्ती प्रक्रिया तातडीने पूर्ण करून पात्र योग शिक्षकांना पुनर्नियुक्तीचे आदेश द्यावेत. अनेक वर्षे सेवा बजावणाऱ्या योग शिक्षकांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करण्यासाठी शासन स्तरावर प्रस्ताव पाठवावा. योग शिक्षकांचे थकीत मानधन तातडीने अदा करून भविष्यात मानधन नियमित मिळण्याची व्यवस्था करावी. योग शिक्षण व आरोग्य संवर्धनाला संस्थात्मक बळ देण्यासाठी महाराष्ट्र राज्य योग आयोगाची स्थापना करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा.

आरोग्याचा संदेश देणाऱ्यांच्या रोजगाराकडे दुर्लक्ष का?

ग्रामीण भागात नागरिकांना निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या योग शिक्षकांच्याच रोजगाराचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहणे ही गंभीर बाब आहे. शासनाच्या आरोग्यविषयक उपक्रमांना हातभार लावणाऱ्या योग शिक्षकांना आर्थिक असुरक्षिततेत काम करावे लागत असेल तर प्रशासनाच्या आरोग्य धोरणावरच प्रश्न उपस्थित होतो अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

प्रशासनाने आता केवळ आश्वासनांची मलमपट्टी न करता योग शिक्षकांच्या मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा. तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नात हस्तक्षेप करून शासन दरबारी प्रभावी पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून निवेदने भेटीगाठी आणि पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने योग शिक्षकांचा संयमाचा बांध फुटला आहे. प्रशासनाने प्रलंबित मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर जिल्हा परिषद जालना येथील मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण छेडण्यात येईल असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र योग शिक्षक संघाने दिला आहे.

यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गजानन मस्के यांना निवेदन देताना महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बालकुमार चाटला, गजानन पांडुरंग पुरी, परमेश्वर लहिरे, भरत मुळे, संभाजी लंगोटे, विशाल आंबेकर, माऊली दोबोले, विठ्ठल शेजुळ, कृष्णा उगले, गीता कोल्हे, वृषाली आचार्य, कविता खोसे, स्वप्ना तुपकर, शिल्पा शेलगावकर, सुषमा देशपांडे यांच्यासह जालना जिल्ह्यातील योग शिक्षक उपस्थित होते.



## जवळबन येथील अपघातात मृत्यू झालेल्या विठ्ठल करपे यांच्या वारसांना दि ओरियन्टल इन्शुरन्स कडून १५ लाखाची मदत

केज/प्रतिनिधी

जवळबन येथील अपघातात मृत्यू झालेल्या श्री विठ्ठल आबा करपे यांनी आपल्या गाडीचा विमा विमा प्रतिनिधी माधव धपाटे यांचे कडून ओरिएंटल इन्शुरन्स या कंपनीकडून थर्ड पार्टी विमा घेतला होता ते गाडीचालवत असताना त्यांचा अपघाती मृत्यू झालेला होता तरी पॉलिसीमध्ये ओनर ड्रायव्हरची जोखिम कव्हर होती त्या अनुषंगाने कंपनीकडे रीतसर फोनवरून ओनर ड्रायव्हरचा क्लेम दाखल केलेला होता तरी सर्व डॉक्युमेंटची पूर्तता केल्यानंतर ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे टीपी हब कार्यालय नाशिक श्री.वाघ साहेब यांच्या कडून मयतांच्या वारसांच्या खात्यावर दिनांक ७ आगस्ट २०२६ रोजी १५ लाख रुपये क्लेम जमा केला आहे.त्याबद्दल मयतांच्या वारसांनी ओरिएंटल इन्शुरन्स या कंपनीचे आभार व्यक्त केले आहे तसेच विमा प्रतिनिधी माधव धपाटे यांचे आभार मानले आहेत.तसेच प्रत्येक व्यक्तीने विमा काढावा असे आवाहन केले आहे.

### टीसी हरवली

करण विठ्ठल गाढे झिरपी ता.अंबड जि.जालना १० वी पास ची टी सी व इतर महत्त्वाचे कागदपत्र झिरपी ते अंबड प्रवासादरम्यान हरवले आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा: ८४६८९४२४५९

### टीसी हरवली

गायकवाड भिवा आसराजी , रा. टाका, ता. अंबड, जि. जालना यांच्या नावाची इयत्ता ५ वी पासची टीसी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, वडीगोद्री येथून अंबडकडे प्रवास करताना हरवली आहे.

सदर टीसी कोणाला सापडल्यास कृपया मो. ९८६०६०२३१२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# बठाण बु.येथे गुणवंतांचा गौरव अन् सेवापूर्ती सोहळा उत्साहात

## शिक्षणासोबत समाजाप्रती देणे लागते ही भावना जपा पोलीस निरीक्षक अभिजित मोरे



जालना शेख फारुक :-

सर्व गावकरी मित्रमंडळ बठाण बु.आणि ज्ञान संजीवनी फाउंडेशन जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणगौरव व सेवापूर्ती सोहळा २०२५-२६ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंतांचा तसेच सेवानिवृत्त मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.संजीवनी हॉस्पिटलचे संचालक तथा आयएमए खच- अध्यक्ष डॉ. बळीराम बागल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास पोलीस निरीक्षक अभिजित मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर सत्कारमूर्ती डॉ. सुभाष बागल चिस्तीया महाविद्यालय, खुलताबाद, सेवानिवृत्त मुख्याध्यापक उद्धव बागल सर, दत्तू नाना बागल तसेच सेवानिवृत्त रंगनाथ कव्हळे सर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक अभिजित मोरे म्हणाले शिक्षणासोबत माणूस म्हणून जगणे आणि समाजाप्रती देणे लागते ही भावना प्रत्येकाने जपणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक यशासोबत सामाजिक बांधिलकीही जोपासावी असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. बळीराम बागल यांनी सत्कारमूर्ती तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. साहित्यिक योगदानाबद्दल डॉ. सुभाष बागल यांचा तर प्रदीर्घ शैक्षणिक सेवेतून निवृत्त झाल्याबद्दल उद्धव बागल सर यांचा गौरव करण्यात आला. तसेच आयएमए खच- अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ.बळीराम बागल यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना मान्यवरांनी माजी मुख्याध्यापक पांडुरंग बागल सर यांच्या मार्गदर्शनाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले. त्यांच्या वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच आज आम्ही या स्थानावर पोहोचलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

कार्यक्रमात विविध शैक्षणिक क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान करण्यात आला.आशुतोष कव्हळे छएएढ, शिवतेज कव्हळे (शगएए/चक्ढ-उएढ, शुभम पाटेकर उ- र्त्रीपवरींळेप)श, विशाल सुतार इ.ढशलह व चइ- , कोमल सुतार इ-चड, प्राची बागल डडउ ९३ टक्के, निलेश पाटेकर डडउ ७५ टक्के, पुष्पा जगधने च.ढशलह आणि अक्षय पाटेकर इ.डल. -सीळ यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर बागल यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दिलीप देव्हडे यांनी तर आभार संदीप बागल यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राधाकिसन कव्हळे,डॉ.योगेश बागल,श्रीमंत बागल सर, संदीप बागल सर,दादाराव देव्हडे,परमेश्वर बागल,सचिन बागल,विनोद बागल यांच्यासह सर्व गावकरी मित्रमंडळ व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-४२६ दि.०७.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सुशीला राजकुमार शिंदे, रा.बाबर नगर, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पुजा राजकुमार शिंदे | मुलगी | ०१.०१.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६१४ दि.०७.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **गणेश रोहिदास पवार, रा.सोनक पिंपळगांव, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शरद गणेश पवार | मुलगा | २४.०९.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-९२१ दि.-.-.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **हिना अकबर शेख, रा.वडी गोद्री, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अकील अकबर शेख | मुलगा | ०७.१०.२०११ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१०८७ दि.१०.०८.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **भिवा आसराजी गायकवाड, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | भिवा आसराजी गायकवाड | स्वतः | १५.०३.१९५० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# परतूरमध्ये तिरंगा रॅलीने राष्ट्रभक्तीचा जागर

## घर घर तिरंगा हर घर तिरंगा अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद भारत माता की जयच्या घोषणांनी शहर दुमदुमले

परतूर पिराजी गायकवाड :-

घर घर तिरंगा हर घर तिरंगा अभियानांतर्गत परतूर शहरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रभक्तीने भारलेल्या वातावरणात झालेल्या या रॅलीला नागरिक, विद्यार्थी युवक महिला तसेच प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हातात तिरंगा आणि मनात राष्ट्रभक्ती घेऊन सहभागी झालेल्या नागरिकांमुळे संपूर्ण शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

माजी मंत्री बबनराव लोणीकर आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही रॅली पार पडली. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे भाजप युवा



मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संपत टकले, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, पोलिस निरीक्षक सुदाम भागवत, गटविकास अधिकारी कौशल्य पाटील, नगराध्यक्ष प्रियंका राक्षे, रमेश भापकर, उपसभापती संभाजी वारे यांच्यासह नगरपरिषदेचे नगरसेवक उपस्थित होते.

रॅलीमध्ये विविध शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, युवक, महिला आणि राष्ट्रप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. तिरंगा हातात घेऊन विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी दिलेल्या घोषणांनी शहरातील वातावरण भारावून गेले.

भारत माता की जय वंदे मातरम् जय हिंद अशा घोषणांनी परतूर शहर दुमदुमून गेले. रॅलीच्या माध्यमातून राष्ट्रध्वजाबद्दलचा सन्मान, देशप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

राष्ट्रध्वजाने सजले शहर

घर घर तिरंगा हर घर तिरंगा अभियानामुळे परतूर शहरातील विविध भागांमध्ये तिरंग्याची सजावट करण्यात आली. रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांच्या हातातील तिरंग्यामुळे शहराचे वातावरण राष्ट्रभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले होते.

# आडस येथे होणार किर्तन केसरी ह.भ.प.अक्रुर महाराज साखरे यांचे किर्तन

केज/प्रतिनिधी

सत्तरच्या दशकातील केज,अंबाजोगाई तालुक्यातील सहकार, शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून विकासाची गंगा खेचुन आणणारे लोकनेते माजीआमदार स्व.बाबुरावजी आडसकर यांच्या कामाच्या माध्यमातून अजुनही शेतकरी, शेतमजूर यांच्या मनात कायम स्मृती आहेत. त्यांचा हाबाडा हा शब्द संपुर्ण महाराष्ट्रात गाजला होता.लोकनेते माजी आमदार स्व. बाबुरावजी आडसकर यांच्या दहाव्या पुण्यतिथी निमित्त दि. १२ आगस्ट २०२६ रोजी बुधवारी छत्रपती शिवाजी विद्यालय आडस या ठिकाणी सकाळी दहा वाजता किर्तन केसरी ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे, गेवराई यांचे पुण्यतिथी निमित्त किर्तन होणार आहे अशी माहिती अंबा सहकारी कारखाना,अंबाजोगाई चे चेअरमन रमेशराव आडसकर यांनी दिली आहे.याकार्यक्रमासाठी व महाप्रसादासाठी केज,अंबाजोगाई, धारूर,वडवणी व माजलगाव तालुक्यातील सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केले आहे.





## भागवतकथेतूनच मानवी जीवनाची सार्थकता - दादा महाराज दिक्षित

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

भागवत कथा ही श्रवण करायची नसून जगायची आहे ती कल्याणकारी कथा असून तिच्या श्रवणातून मनुष्य जीवनाचे सार्थक होते असे प्रतिपादन भागवतकार ह.भ.प. दादा महाराज दिक्षित यांनी केले. श्रीमद् भागवत कथा समारोप प्रसंगी ते बोलत होते भागवत कथेचा समारोप दुपारी भक्तिभावात मिरवणुकीने झाला.श्रीमद् भागवत कथा ही समाजाला विश्वचेतनेचा महामंत्र देणारी आहे. 'सर्वांभूती परमेश्वर' हा भाव जागृत करणारी ही जीवनदृष्टी आहे, कथे मधील श्रीकृष्ण लिला, गोवर्धन कथा मंगलाचरण, 'परीक्षित जन्म, शुक-सनकादि संवाद व भागवत महात्म्य यावर निरूपण करून कलियुगात भगवंत नामाशिवाय तरणोपाय नाही असेही त्यांनी सांगितले यावेळी परिसरातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ५९ जाती गुण्यागोविंदाने नांदत असतांना सरकारने भांडणं लावण्याचं काम करू नये अन्यथा गाठ आमच्याशी - आनंदराज आंबेडकर

## परळीत उपवर्गीकरण विरोधी महामोर्चास हजारोंची उपस्थिती

परळी /प्रतिनिधी

विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान राष्ट्राला अर्पण करताना या देशातील अनुसूचित जातीला ३४१ कलमानुसार एकत्र ठेवले आहे. महाराष्ट्रात ५९ जाती गुण्यागोविंदाने नांदत असतांना यामध्ये सरकारने जाती-जातीत भांडण लावण्याचा उद्योग करू नये अन्यथा गाठ आमच्याशी आहे असा सज्जड इशारा रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांनी परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या उपवर्गीकरण विरोधी महामोर्चात बोलताना सरकारला दिला. तर यावेळी चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी मंत्री बबनराव घोलप यांनी वर्गीकरणाची कुणीही मागणी केलेली नसताना सरकार षडयंत्र करत असल्याचा आरोप केला.

महाराष्ट्र सरकार महाराष्ट्रात अनुसूचित जातीत असलेल्या आरक्षणात उपवर्गीकरणाच्या नावाखाली फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे राज्य सरकारचा हा प्रयत्न हाणून पाडावा, अनंत बद्दर समिती बरखास्त करावी, तसेच खाजगीकरणात आरक्षण लागू करावे आदी प्रमुख मागण्यासाठी आज दिनांक १० ऑगस्ट रोजी रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक भव्य असा महामोर्चा काढण्यात आला. यावेळी बोलताना सरसेनापती आनंदराज आंबेडकर म्हणाले की, उपवर्गीकरणाच्या विरोधात महाराष्ट्रात सर्वत्र मोठमोठे अनुसूचित जातीतील ५९ जातींचे मोर्चे निघत आहेत. या मोर्चाचा सरकारवर परिणाम होत आहे.मोर्चे हिवाळी अधिवेशना पर्यंत चालू राहतील.तोपर्यत सरकारने ऐकलं नाही तर अधिवेशनाला घेराव घालू.९० टक्के मातंग समाज सोबत आहे .

सरकार अल्पसंख्याक समाजाचे आहे. त्यांना बहुजन एकत्र आले तर याची सरकारला भिती वाटत आहे.म्हणून हा उपवर्गीकरण करण्याचा डाव आखला जात आहे.जन आक्रोशाला शांतपणे आम्ही




आमच्या मागणीद्वारे मांडत आहोत.आता पर्यंत आम्ही शांततणे मोर्चे काढत आहोत.दिल्लीत धर्मेंद्र गेला आता देवेंद्र जाईल.समाज जे सोबत नाहीत त्यांना धडा शिकविल असेही ते म्हणाले. तर अडवोकेट अमन आनंदराज आंबेडकर यांनी आम्ही बाबासाहेबांचे वाघ आहोत. आमच्या एका बापाने मनूवाद्याला संपवले आहे. भीमा कोरेगाव चा इतिहास आमच्या शौर्याचा इतिहास आहे. ५९ जाती एकत्र आहेत ही एकी अशीच निवडणुकीपर्यंत दाखवा असे आवाहन अमन आंबेडकर यांनी केले.

याप्रसंगी बोलतांना रोहिदास बनसोडे यांनी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे व माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आरक्षण उपवर्गकरणाविषयी आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी केली.अनुसूचित जातीतील मातंग समाजाचे प्रतिनिधी लक्ष्मण शिंदे, संदीप मस्के यांनी मातंग समाजाच्या वतीने बोलताना तन-मन धनाने अनुसूचित जातीचे ऐक्य टिकवण्यासाठी बौद्ध समाजासोबत असल्याचे सांगितले. अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चाचे निवेदन मुलींचे हस्ते तहसीलदारांना देण्यात आले. तर मुलींच्याच हस्ते आनंदराज आंबेडकर यांचा व बबनराव घोलप यांना भारतीय संविधान देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विचार पिठावर भंते महाविरो, पांडुरंग साबणे,मोची समाजाचे दिपक पिंपळे उपस्थित होते. सभेला सुरुवात होण्यापूर्वी समता सैनिक दलाच्या वतीने आनंदराज आंबेडकर यांना सलामी देण्यात आली.

मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर बस स्थानक रोडवर असलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार,रेल्वे स्टेशन येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर मोर्चा एकमिनार चौक,उड्डाणपूल, फुलेनगर, सिद्धार्थनगर, भिमवाडी रोडे चौक, राणी लक्ष्मीबाई टावर मार्गे मोंढा मार्केट येथील मैदानात पोहोचला व तेथे भव्य जाहीर सभा संपन्न झाली. मोर्चात जय जय जयभीम , भारतीय संविधान जिंदाबाद,आरक्षण उपवर्रगीकरण रद्द करा,अनंत बदर समिती बरखास्त करा, अनुसूचित जाती ऐक्याचा विजय असो, दिलंय भीमांन खा गुमानं या घोषणांनी परिसर दुमदुमला.

सभेचे प्रास्ताविक चर्मकार समाजाची विद्यार्थिनी श्रद्धा सूर्यवंशी हिने केले. याचवेळी कुमारी प्रतिक्षा अरुण उजगरे या विद्यार्थिनी धडाकेबाज भाषण केले.

# बीडमध्ये ७५ वर्षीय ज्येष्ठ बुद्धाचार्य दांपत्याचा छळ..!

## सुनेकडून संपत्तीसाठी दबाव, खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप, पोलिस संरक्षणाची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागसेन बुद्ध विहार परिसर , पालवण चौक येथील ७५ वर्षीय ज्येष्ठ बुद्धाचार्य ज्ञानोबा निवृत्ती पोटभरे यांनी स्वतःच्या मालकीच्या घरात सुरक्षितपणे राहता यावे, पोलिस संरक्षण मिळावे तसेच आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, यासाठी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात लेखी अर्ज दाखल केला आहे. यावर पोलिसांनी मात्र गांभीर्याने दखल न घेता पोलीस अधीक्षकांनी सांगून देखील साधे पोलीस संरक्षण सुद्धा दिले नाही त्यामुळे या वृद्ध दांपत्यांवर काही दुर्दैवी घटना ओढावली तर त्याला जबाबदार कोण राहणार ?असा प्रश्न निर्माण झाला आहे.

अर्जात पोटभरे यांनी दावा केला आहे की, त्यांची दिवंगत मुलाची पत्नी पूजा मिलिंद पोटभरे तसेच तिचे ठझख गटाचे कार्यकर्ते दयानंद उजगरे आणि माहेरच्या इतर नातेवाईकांकडून मुलीच्या नावावर घर करून देण्यासाठी त्यांचा सातत्याने मानसिक, शारीरिक व आर्थिक छळ केला जात आहे. संबंधित व्यक्तींकडून दमदाटी करण्यात येत असून, त्यांच्याविरोधात खोटे आरोप करून पोलिसांमार्फत गुन्हे दाखल करण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. यापूर्वी विविध सक्षम प्राधिकरणांकडे तक्रारी करूनही प्रभावी कारवाई झाली नसल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

अर्जानुसार, २ ऑगस्ट २०२६ रोजी स्वतःच्या घरात परत जाण्यापूर्वी पोलिस संरक्षण मिळावे म्हणून पोटभरे दांपत्य शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अर्ज देण्यासाठी गेले होते. मात्र, पोलिसांनी अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यानंतर त्यांनी बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार ते ४ ऑगस्ट २०२६ रोजी सुमारे चार महिन्यांनंतर स्वतःच्या घरात राहण्यासाठी गेले असता, त्यांच्या




विरोधात पुन्हा खोटी तक्रार दाखल करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.

तक्रारीनुसार, ५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी पोटभरे हे घराबाहेर असताना त्यांच्या पत्नी कुसुम पोटभरे या घरी एकट्या होत्या. त्यावेळी घरात येऊन त्यांना स्वयंपाक करू दिला नाही, शिवीगाळ केली, धक्का देऊन घराबाहेर हाकलले तसेच पुन्हा घरात आल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

पोटभरे दांपत्याने अर्जात नमूद केले आहे की, ते दोघेही ज्येष्ठ नागरिक असून उच्च रक्तदाब व मधुमेहाने त्रस्त आहेत. सततच्या कथित छळामुळे त्यांना स्वतःचे घर सोडून बाहेर राहण्याची वेळ आली असून त्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाल्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

अर्जात त्यांनी अत्यंत भावनिक शब्दांत प्रशासनाला साद घालत म्हटले आहे की, आमच्या मृत्यूची बातमी येईपर्यंत पोलिस प्रशासनाने वाट पाहू नये. आम्ही दोघेही ज्येष्ठ नागरिक असून सातत्याने होत असलेल्या कथित मानसिक व शारीरिक छळामुळे आमच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. उशीर होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संरक्षण द्यावे व न्याय मिळवून द्यावा, अशी त्यांनी कळकळीची विनंती केली आहे.

पोटभरे दांपत्याने आपल्या तक्रारीत असा आरोपही केला आहे की, निरपराध ज्येष्ठ नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल करून खऱ्या दोषींना संरक्षण दिले जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच ज्येष्ठ नागरिक संरक्षण कायद्याअंतर्गत तातडीने पोलिस संरक्षण देण्यात यावे, अशी त्यांनी मागणी केली आहे.

ही बाब केवळ एका कुटुंबापुरती मर्यादित नसून ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा, सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचा आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे व कायद्याप्रमाणे योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. समाजानेही अशा प्रकरणांकडे संवेदनशीलतेने पाहून ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचारांविरोधात आवाज उठवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# छत्रपती संभाजीनगरात 'स्वदेश फॅशन व लाईफस्टाईल एक्स्पो २०२६'चा भव्य सोहळा

## १४ ते १६ ऑगस्टदरम्यान देशभरातील कारागीर, उद्योजक, हस्तकला व स्वदेशी उत्पादनांचा अनोखा संगम

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या (एमएसएमई) सहकार्याने 'शिखाज कारागीरी' या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने 'स्वदेश फॅशन व लाईफस्टाईल एक्स्पो २०२६' या भव्य हस्तकला व स्वदेशी उत्पादनांच्या प्रदर्शनाचे आयोजन छत्रपती संभाजीनगरात करण्यात आले आहे. १४ ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सागर रिसॉर्ट्स येथे हा अनोखा स्वदेशी महोत्सव रंगणार आहे.

देशाच्या विविध भागांतील कारागीर, उद्योजक आणि महिला उद्योजिकांनी तयार केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण वस्तू एकाच छताखाली पाहण्याची आणि खरेदी करण्याची संधी या प्रदर्शनाच्या माध्यमातून नागरिकांना मिळणार आहे. १०० हून अधिक पुरस्कारप्राप्त कारागीर, एमएसएमई उद्योग, स्टार्टअप्स, महिला उद्योजिका, हातमाग व हस्तकला उत्पादक, 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' उपक्रमातील उद्योजक, सहकारी संस्था तसेच विविध लाईफस्टाईल ब्रँड्स या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत.




प्रदर्शनाला ट्रायफेड , खादी आणि ग्रामोद्योग आयोग , नॅशनल ज्यूट बोर्ड यांसह केंद्र व राज्य शासनाशी संबंधित विविध संस्थांचे सहकार्य लाभणार आहे. त्यामुळे विविध राज्यांच्या पारंपरिक कला, संस्कृती, कारागिरी आणि आधुनिक उद्योजकतेचे वैविध्यपूर्ण दर्शन नागरिकांना एकाच ठिकाणी अनुभवता येणार आहे.

फॅशनपासून हस्तकलेपर्यंत...

खरेदीचा अनोखा अनुभव

या प्रदर्शनात साड्या, ड्रेस मटेरियल, फॅशन व एथनिक वेअर, ज्वेलरी व फॅशन ॲक्सेसरीज, बॅग्स, हस्तकला वस्तू, होम डेकोर, लाईफस्टाईल उत्पादने, हँडीक्राफ्ट व हँडलूम वस्तू, महिला उद्योजक व छोट्या व्यवसायांची उत्पादने तसेच हाताने बनविलेल्या आणि पर्यावरणपूरक वस्तू उपलब्ध असणार आहेत.

मात्र हे प्रदर्शन केवळ खरेदीचा बाजार नसून देशभरातील कारागीर, महिला उद्योजक, स्टार्टअप्स आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना थेट ग्राहक आणि बाजारपेठ उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

कारागिरांच्या कौशल्याला योग्य बाजारपेठ मिळावी, त्यांच्या उत्पादनांना व्यापक ग्राहकवर्ग मिळावा आणि स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन मिळावे, हा या प्रदर्शनामागील प्रमुख उद्देश आहे.

कारागिरी म्हणजे केवळ एखादी वस्तू तयार करण्याचे कौशल्य नव्हे; तर पिढ्यान्पिढ्या जपलेली कला, परंपरा, कल्पकता आणि स्थानिक ज्ञानाचा अमूल्य वारसा आहे. देशाच्या विविध राज्यांतील अशाच समृद्ध कारागिरीला आधुनिक बाजारपेठेशी जोडण्याचे काम या प्रदर्शनाच्या माध्यमातून होणार आहे. त्यामुळे भारतीय पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक उद्योजकतेचा अनोखा संगम नागरिकांना अनुभवता येणार आहे.

'व्होकल फॉर लोकल'ला नागरिकांचा थेट सहभाग

'आत्मनिर्भर भारत', 'व्होकल फॉर लोकल' आणि 'मेक इन इंडिया' या संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीची जोड देणारे हे प्रदर्शन ठरणार आहे. स्वदेशी वस्तू खरेदी करून स्थानिक तसेच देशभरातील कारागीर, महिला उद्योजक आणि छोट्या उद्योगांना पाठबळ देण्याची संधी नागरिकांना या निमित्ताने मिळणार आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भूमीवर साकारत असलेला हा 'स्वदेशीचा भव्य उत्सव' नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील कलाकुसर, पारंपरिक हस्तकला, हातमाग, नावीन्यपूर्ण उत्पादने आणि उद्योजकतेची नवी ऊर्जा एकाच छताखाली अनुभवण्याची संधी या निमित्ताने मिळणार आहे.

मराठवाड्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

मराठवाड्यातील नागरिकांनी या प्रदर्शनाला केवळ भेट न देता स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि देशभरातील कारागीर व उद्योजकांच्या कलेला थेट बाजारपेठ मिळवून देण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

१४ ते १६ ऑगस्टदरम्यान सागर रिसॉर्ट्स येथे होणाऱ्या या स्वदेशी महोत्सवाला कुटुंबीयांसह आवर्जून भेट द्या; देशाच्या विविध भागांतील अस्सल कारागिरी, आकर्षक फॅशन, हस्तकला आणि स्वदेशी उत्पादनांचा अनुभव घ्या आणि 'व्होकल फॉर लोकल'च्या संकल्पनेला प्रत्यक्ष खरेदीतून बळ द्या, असे आवाहन करण्यात आले आहे.

# लेखणीने कुणाचे आयुष्य उद्ध्वस्त होणार नाही, याचे भान पत्रकारांनी ठेवावे..

## पुढारी होणे सोपे नाही, रोज ठेचा अन् टीकेचा सामना करावा लागतो : पालकमंत्री संजय सिरसाट









### छत्रपती संभाजीनगरात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे मराठवाडा विभागीय अधिवेशन ताज हॉटेलमध्ये उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

पत्रकारिता ही लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून, पत्रकारांनी निर्भीडपणे काम करताना आपल्या लेखणीचा समाजहितासाठी वापर करावा. मात्र, बातमी लिहिताना तिच्यामुळे कुणाचे आयुष्य उद्ध्वस्त होणार नाही, याचे भानही पत्रकारांनी ठेवले पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय सिरसाट यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी तसेच पत्रकारांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी आयोजित मराठवाडा विभागीय अधिवेशन व 'मराठवाडा भूषण' पुरस्कार सोहळा छत्रपती संभाजीनगर येथील गेटवे हॉटेल सभागृहात ९ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडला. यावेळी उद्घाटनप्रसंगी मंत्री सिरसाट बोलत होते.

कार्यक्रमाच्या मंचावर पत्रकार संघाचे संस्थापक प्रदेश संघटक संजय भोकरे, मनसे नेते तथा माजी गृहराज्यमंत्री बाळा नांदगावकर,विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष तथा आयोजक अनिल सावंत, ज्येष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य, जिल्हाध्यक्ष छबुराव ताके आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर संघटनेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २६ व्यक्तींना 'मराठवाडा भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांच्या हस्ते नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी संस्थानच्या वतीने निलेश सोमाणी, विश्वासराव आरोटे, वैभव स्वामी,डॉ.संजय शिंदे व अनिल सावंत यांचा आशीर्वादरूपी विशेष सत्कार केला.

यावेळी मनोगत व्यक्त करताना पालकमंत्री संजय सिरसाट म्हणाले की, पुढारी होणे सोपे नाही. रोज ठेचा लागतात आणि टीकेचा सामना करावा लागतो. पत्रकारितेतही अशीच जबाबदारी असते. पत्रकारांनी समाजातील प्रश्न निर्भीडपणे मांडावेत मात्र आपल्या लेखणीमुळे एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.

पत्रकारांनी सत्य मांडताना सामाजिक जबाबदारी आणि संवेदनशीलता जपणे गरजेचे आहे. पत्रकारिता ही केवळ बातमी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया नसून समाजाला दिशा देणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे पत्रकारांनी आपल्या लेखणीचा उपयोग समाजहितासाठी करावा, असे आवाहन सिरसाट यांनी केले.

'लेखणी ही समाजाच्या वेदनेला वाचा फोडणारी शक्ती' असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले.

दुपारच्या सत्रात 'लेखणीची क्रांती' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादात ज्येष्ठ पत्रकार डॉ.धनंजय लांबे, डॉ.शाहेद शेख, संजय शिंदे, लेखिका जयश्री भगत, विष्णु आचार्य,वैभव स्वामी आदींनी सहभाग घेतला.

निलेश सोमाणी यांनी आजच्या पत्रकारितेचे बदलते स्वरूप, डिजिटल मीडिया, सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयपर्यंत झालेल्या प्रवासावर भाष्य केले.

**'पत्रकारांच्या सुखात नव्हे, तर दुःखात संघटना धावते' – प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ही संघटना पत्रकारांच्या सुखातच नव्हे तर त्यांच्या अडचणीच्या आणि दुःखाच्या काळातही मदतीला धावून जाणारी संघटना असल्याचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी स्पष्ट केले. संघटनेच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देतानाच शासनाने पत्रकार आर्थिक विकास महामंडळावर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करून पत्रकारांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.पत्रकारांच्या विविध मागण्या व ठरावांबाबत शासन दरबारी पाठपुरावा सुरू असल्याचेही आरोटे यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात महाराष्ट्रासह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा महाराजांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तसेच डॉ. धनंजय लांबे, डॉ. शाहिद शेख यांच्यासह प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी व प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. मराठवाडा विभागाच्या वतीने जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

अधिवेशनाला मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागांतील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी मराठवाडा विभागातील पत्रकारांनी परिश्रम घेतले.

पत्रकार हा कायम विरोधी पक्षात असतो. पत्रकारांनी आपले काम निर्भीडपणे जनहितार्थ करावे. राज्य पत्रकार संघ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. आज बदलत्या काळानुसार पत्रकारिता देखील बदलत आहे. मिडिया टिकली पाहिजे आणि ती वाढली पाहिजे. तरच या देशाची लोकशाही अधिक सक्षम आणि बळकट होईल.याची जाणीव राज्यकर्त्यांनी आणि प्रशासनकर्त्यांनी ठेवली पाहिजे. शासनाने लाडक्या बहिणी सोबतच सर्वांना समान न्याय द्यावा असे परखड मत पत्रकार संघाचे संस्थापक तथा प्रदेश संघटक संजय भोकरे यांनी व्यक्त केले.

# ५०० हेक्टर जमीन दिली, मग प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना रोजगार कधी

## चार-पाच वर्षांनंतरही स्थानिक युवक रोजगाराच्या प्रतीक्षेत कंपनीकडून थेट नियुक्तीची मागणी

मागण्या मान्य न झाल्यास १५ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा

जामखेड विलास बा.जाधव :-

अंबड तालुक्यातील जामखेड परिसरातील सुमारे ५०० हेक्टर जमीन टाटा पॉवर रिन्यूएबल एनर्जीच्या सौर प्रकल्पासाठी देऊनही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील पात्र युवकांना अद्याप अपेक्षित रोजगार मिळाला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.प्रकल्प सुरू होऊन चार-पाच वर्षांचा कालावधी उलटला तरी स्थानिक युवक रोजगाराच्या प्रतीक्षेत असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून मागण्या मान्य न झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

जामखेड व परिसरातील शेतकऱ्यांनी सौर प्रकल्पासाठी आपल्या जमिनी उपलब्ध करून दिल्या.जमीन दिल्यानंतर प्रकल्पग्रस्त कुटुंबातील पात्र युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात अनेक स्थानिक युवकांना अद्याप रोजगार मिळालेला नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पासाठी जमीन देऊनही आपल्या कुटुंबातील युवकांना रोजगारापासून वंचित राहावे लागत असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

तृतीय पक्ष नव्हे कंपनीकडूनच थेट नियुक्ती सौर प्रकल्पातील विविध कामांसाठी तृतीय पक्ष एजन्सीमार्फत नियुक्त्या करण्याऐवजी कंपनीने थेट प्रकल्पग्रस्त कुटुंबातील पात्र युवकांना रोजगार द्यावा अशी प्रमुख मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील पात्र युवकांना रोजगार देताना प्राधान्यक्रम निश्चित करावा अशी मागणीही करण्यात आली आहे.




सुरक्षा व्यवस्थेतही स्थानिकांना संधी द्या

प्रकल्प परिसरातील सुरक्षा व्यवस्थेसाठी महाराष्ट्र सुरक्षा बलाचा एमएसएफ वापर होत असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. सुरक्षा व्यवस्थेतील पात्र पदांवर तसेच प्रकल्पाशी संबंधित इतर कामांमध्ये स्थानिक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे.मोठ्या क्षेत्रावरील जमीन सौर प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिल्याने संबंधित शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील पात्र युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे ही सामाजिक जबाबदारी असल्याची भूमिका शेतकऱ्यांनी मांडली आहे. रोजगाराचा प्रश्न वेळीच मार्गी न लागल्यास पुढील पिढीच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

कायद्यानुसार हक्क व लाभ देण्याची मागणी

जमीन संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना कायदा २०१३ तसेच महाराष्ट्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील लागू तरतुदींनुसार प्रकल्पग्रस्तांना मिळणारे हक्क व लाभ याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने तसेच संबंधित कंपनीने प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.मागण्यांवर समाधानकारक तोडगा न निघाल्यास १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा वंचित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान निवेदनातील आरोप व मागण्यांबाबत संबंधित कंपनीची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.त्यामुळे जिल्हा प्रशासन आणि कंपनी याप्रकरणी काय निर्णय घेतात याकडे प्रकल्पग्रस्त शेतकरी व स्थानिक युवकांचे लक्ष लागले आहे.



### एक पेड माँ के नाम'श उपक्रमांतर्गत साने गुरुजी निवासी विद्यालयात ५५ वृक्षांचे वृक्षारोपण

केज/प्रतिनिधी

पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात 'एक पेड माँ के नाम' याउपक्रमा अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी विद्यालयाच्या परिसरात विविध प्रजातींच्या तब्बल ५५ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.या वृक्षारोपण कार्यक्रमास बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष अड. उद्धव अण्णा कराड यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच सानेगुरुजी निवासी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य डॉ.कविता गीते-कराड,इको क्लब विभागाचे विभाग प्रमुख गंगाधर गीते, अर्चना संकाये,दिपाली कांदे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन,पर्यावरण रक्षणाचा संदेश देत वृक्षांची नियमित काळजी घेण्याचा संकल्प केला.केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या झाडांचे संगोपन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.'एक पेड माँ के नाम' याउपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण होण्यासोबतच निसर्ग प्रेम,वृक्षसंवर्धन आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजण्यास मदत होत आहे.विद्यालयाच्या परिसरात झालेल्या या वृक्षारोपणामुळे पर्यावरण संवर्धनाला हातभार लागणार असून,विद्यार्थ्यांसाठी शालेय परिसर हिरवाईने नटलेले दिसत असल्याने आनंददायी वातावरण निर्माण होणार आहे.

# योग शिक्षकांच्या मागण्यांवर प्रशासनाची योगनिद्रा

## वारंवार निवेदने देऊनही प्रश्न जैसे थे पुनर्नियुक्ती थकीत मानधनासह कायमस्वरूपी सेवेसाठी शिक्षक आक्रमक

मागण्या मार्गी न लागल्यास सीईओ कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

जालना प्रतिनिधी :-

ग्रामीण भागातील नागरिकांना योगाचे धडे देत आरोग्य संवर्धनाचे काम करणाऱ्या योग शिक्षकांच्या प्रश्नांवर मात्र प्रशासनाचीच योगनिद्रा सुरू असल्याचा संतापजनक आरोप महाराष्ट्र योग शिक्षक संघ जालना यांनी केला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून विविध मागण्यांसाठी वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याने योग शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. आता मागण्या तातडीने मार्गी न लागल्यास जिल्हा परिषद जालना येथील मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासमोर लोकशाही व सनदशीर मार्गाने आमरण उपोषण करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

जालना जिल्हा परिषद अंतर्गत विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये योग शिक्षक कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील महिला, ज्येष्ठ नागरिक,युवक,विद्यार्थी तसेच जीवनशैलीजन्य आजारांपासून बचावासाठी नागरिकांना योग प्रशिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण काम या शिक्षकांकडून केले जाते. आरोग्य जनजागृतीचा भार उचलणाऱ्या या योग शिक्षकांच्या सेवा व रोजगाराचा प्रश्न मात्र वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने त्यांच्या भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

निवेदनांचा पाऊस प्रशासनाकडून निर्णयाचा दुष्काळ योग शिक्षकांच्या प्रश्नांवर जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी तालुका आरोग्य अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींना



वेळोवेळी निवेदने देण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांना २३ जून २०२५, १५ डिसेंबर २०२५ आणि १३ फेब्रुवारी २०२६ रोजी निवेदने देण्यात आली. तर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना ३० सप्टेंबर २०२५ रोजी निवेदन सादर करण्यात आले. जिल्हा आरोग्य विभागाकडेही विविध वेळेस पाठपुरावा करण्यात आला.

एवढेच नव्हे, तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची प्रत्यक्ष भेट घेऊन योग शिक्षकांचा प्रश्न विधानसभेत मांडावा आणि शासन स्तरावर न्याय मिळवून द्यावा अशी मागणीही करण्यात आली. मात्र निवेदनांवर निवेदनांचा मारा करूनही ठोस निर्णय होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

आमच्या निवेदनांचे झाले काय?

आजवर सादर केलेल्या निवेदनांवर प्रशासनाने नेमकी कोणती कार्यवाही केली? प्रस्ताव कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे? कोणत्या विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला? पुढील कार्यवाही कधी होणार? याबाबत प्रशासनाकडून स्पष्ट लेखी माहिती देण्यात आलेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

त्यामुळे पूर्वीच्या सर्व निवेदनांवरील कार्यवाहीचा सविस्तर लेखी अहवाल देण्याची मागणीही करण्यात आली आहे. प्रत्येक मागणीवर स्वतंत्रपणे कोणती कार्यवाही झाली प्रस्ताव कोणत्या कार्यालयाकडे पाठविण्यात आला, त्याची सद्यस्थिती काय आहे आणि पुढील निर्णयासाठी काय अपेक्षित आहे याची स्पष्ट माहिती देण्याची मागणी योग शिक्षकांनी केली आहे.

पान २ वर...

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आपल्या आयुष्याच्या प्रवासात

पिंपरी पुणे । प्रतिनिधी

आपल्या आयुष्याच्या प्रवासात अनेक माणसं आपल्याला भेटतात. काही माणसं वाटेवरच्या प्रवाशांसारखी असतात थोडा वेळ आपल्यासोबत चालतात आणि नंतर आपापल्या वाटेने निघून जातात. काही नाती काळाच्या ओघात दूर जातात, पण काही माणसं मात्र आपल्या मनात अशी जागा निर्माण करून जातात, जी आयुष्यभर कुणीही घेऊ शकत नाही.

ही माणसं नेहमी आपल्या रक्ताच्या नात्यातीलच असतील असं नाही.ती आपली आई, वडील, भाऊ, बहीण, मित्र, मैत्रीण, शिक्षक, मार्गदर्शक किंवा आपल्या प्रत्येक सुख-दुःखात मनापासून साथ देणारी कोणतीही व्यक्ती असू शकते.कारण प्रत्येक नात्याला नाव असायलाच हवं असं नाही. काही नाती फक्त मनाने जोडलेली असतात.आई म्हणजे मायेची सावली, वडील म्हणजे आधाराचा भक्कम खांब. भाऊ-बहीण म्हणजे कधी भांडणं, कधी रुसवे - फुगवे आणि तरीही संकटाच्या वेळी सर्वात आधी धावून येणारी माणसं.मित्र-मैत्रीण म्हणजे रक्ताचं नातं नसतानाही मनातलं दुःख ओळखणारी, आपल्या आनंदात मनापासून आनंदी होणारी आणि आपण खचल्यावर पुन्हा उभं करणारी माणसं.आपण सुखात असताना आपल्या सोबत हसणारे अनेक असतात; पण दुःखाच्या वेळी आपला हात धरून उभं राहणारे फार थोडे असतात.सुखात टाळ्या वाजवणारे अनेक असतात; दुःखात हात धरणारे मात्र मोजकेच असतात.आणि म्हणूनच अशा माणसांची किंमत ओळखायला हवी.



कृष्ण आणि सुदामा - मैत्रीचा सुंदर अर्थ...

मैत्री म्हटलं की, श्रीकृष्ण आणि सुदामाची मैत्री आपल्या डोळ्यांसमोर येते.

दोघांची परिस्थिती वेगळी होती. एक द्वारकेचा राजा झाला, तर दुसरा साध्या परिस्थितीत जीवन जगत राहिला. पण परिस्थिती बदलली, पद बदललं, अंतर वाढलं तरी त्यांच्या मैत्रीतील आपलेपणा कधीच बदलला नाही.

सुदामा कृष्णाला भेटायला गेला तेव्हा त्याच्या हातात मौल्यवान भेट नव्हती. होते ते प्रेमाने आणलेले साधे पोहे पण कृष्णाने त्या पोह्यांची किंमत त्यांच्या साधेपणाने केली नाही; त्याने त्यामागचं मित्राचं प्रेम पाहिलं.

हीच खरी मैत्री !

जिथे श्रीमंती-गरिबीचा भेद नसतो,
जिथे पद-प्रतिष्ठेचा अहंकार नसतो,
जिथे अपेक्षांची गणितं नसतात,
आणि जिथे फक्त मनापासूनचा आपलेपणा असतो.

कृष्ण-सुदामाची मैत्री आपल्याला शिकवते की नात्याची उंची परिस्थितीने ठरत नाही; ती विश्वासाने आणि प्रेमाने ठरते.

पती-पत्नीचं नातं प्रेमापेक्षा विश्वास मोठा

आपल्या आयुष्यातील सर्वात जवळच्या नात्यांपैकी एक म्हणजे पती-पत्नीचं नातं.या नात्याचा पाया केवळ प्रेमावर नसतो. तो असतो विश्वास, प्रामाणिकपणा, संवाद आणि परस्पर आदरावर.

पतीने पत्नीवर आणि पत्नीने पतीवर असा विश्वास ठेवावा की, माझा जोडीदार माझ्याशी प्रामाणिक आहे, माझ्या भावनांचा आदर करतो आणि आपल्या नात्याची किंमत जाणतो. कारण जिथे प्रेम असतं, तिथे काळजी असते; पण जिथे विश्वास असतो, तिथे प्रत्येक गोष्टीचा संशय घेत बसावं लागत नाही.

सतत चौकशी करणे, प्रत्येक गोष्टीचा वेगळा अर्थ काढणे, फोन तपासणे किंवा प्रत्येक कृतीमागे संशय शोधणे यामुळे नात्यातील प्रेमापेक्षा असुरक्षितता मोठी होऊ लागते. मतभेद होऊ शकतात. रुसवे-फुगवे होऊ शकतात. गैरसमजही होऊ शकतात. पण संवादाची दारं बंद होऊ नयेत. प्रश्न असावेत, पण संशय नसावा. अधिकार असावा, पण बंधन नसावं. प्रेम असावं, पण मालकी हक्क नसावा. खरं प्रेम म्हणजे समोरच्या व्यक्तीला बांधून ठेवणं नाही. प्रेम म्हणजे विश्वासाने मोकळं सोडणं आणि तरीही मनाने एकमेकांशी घट्ट जोडलेलं राहणं.

पती-पत्नीने एकमेकांचे केवळ जीवनसाथी नव्हे, तर मित्र, विश्वासू आणि आधाराचे सोबती बनायला हवं.

कारण सुंदर वैवाहिक नातं तेच
जिथे प्रेम आहे, पण संशय नाही.
जिथे अधिकार आहे, पण बंधन नाही.
जिथे मतभेद आहेत, पण मनभेद नाहीत.
आणि जिथे दोन वेगवेगळ्या व्यक्तींना एकमेकांच्या मनात सुरक्षित जागा मिळते.

नाती जपण्यासाठी मोठ्या गोष्टींची गरज नसते...
नातं जपण्यासाठी नेहमी मोठ्या भेटवस्तूंची गरज नसते.
कधी एक फोन पुरतो.कधी दोन प्रेमाचे शब्द पुरतात.
कधी समोरची व्यक्ती बोलत असताना शांतपणे ऐकून घेणं पुरतं.
कधी फक्त एवढंच म्हणणं पुरतं
मी आहे तुझ्यासोबत.

कारण माणसाला नेहमी उपायांची गरज नसते; कधी कधी त्याला फक्त कोणीतरी आपलं आहे याची जाणीव हवी असते.

आपण जेव्हा खचतो, तेव्हा आपल्याला मोठी भाषणं नको असतात. आपल्याला हवा असतो एक विश्वासाचा हात. आपण अपयशी होतो तेव्हा दोष देणारी माणसं नको असतात; पुन्हा प्रयत्न करण्याची हिंमत देणारी माणसं हवी असतात. आणि आपण यशस्वी होतो तेव्हा आपल्या यशात स्वतःचा वाटा समजून मनापासून आनंदी होणारी माणसं हवी असतात.

आयुष्याची खरी श्रीमंती...

आपण आयुष्यात पैसा कमावतो, पद मिळवतो, प्रसिद्धी मिळवतो, पुरस्कार मिळवतो.
पण या सगळ्यांपेक्षा मोठी कमाई असते ती माणसं कमावण्याची.
ज्यांच्यासमोर आपण स्वतःला सिद्ध करण्याची गरज नसते.
ज्यांच्याशी आपण मन मोकळं करू शकतो.
ज्यांना आपल्या यशापेक्षा आपल्या सुखाची काळजी असते.
ज्यांना आपल्या चेहऱ्यावरचं हसू दिसतं आणि डोळ्यांमधलं दुःखही जाणवतं.
हीच तर आयुष्याची खरी श्रीमंती.

म्हणून आपल्या आयुष्यातील माणसांना गृहीत धरू नका. त्यांना वेळ द्या. त्यांच्याशी प्रेमाने बोला. त्यांच्या सुखात सहभागी व्हा. त्यांच्या दुःखात त्यांच्या सोबत उभे रहा. आणि शक्य असेल तेव्हा त्यांच्या हातात हात द्या.

कारण आपल्या आयुष्याच्या प्रवासात आपण किती लांब चाललो, किती मोठं यश मिळवलं, किती संपत्ती कमावली यापेक्षा महत्त्वाचं असतं

आपल्यासोबत चालणाऱ्या माणसांना आपण किती प्रेमाने जपलं. आयुष्याच्या शेवटी आठवण राहते ती मोठ्या गोष्टींची नाही...

तर त्या छोट्या छोट्या क्षणांची

कोणीतरी आपल्यावर विश्वास ठेवला होता, कोणीतरी आपल्या दुःखात आपला हात धरला होता,

कोणीतरी आपल्या आनंदात मनापासून हसलं होतं, आणि कोणीतरी आपल्या आयुष्याच्या कठीण वळणावर म्हणालं होतं काळजी करू नकोस... मी आहे ना..!

कदाचित म्हणूनच आपल्या आयुष्यातील काही माणसं ही आपली खरी संपत्ती असतात. ती नेहमी आपल्या सोबत नसतीलही...

पण त्यांच्या प्रेमाची ऊब, त्यांच्या विश्वासाची ताकद आणि त्यांच्या आठवणी आपल्या मनात कायम जिवंत राहतात. कारण

काही माणसं आपल्या आयुष्यात येतात, काही आपल्याला घडवतात, काही आपल्याला सावरतात, काही आपल्याला प्रेरणा देतात पण काही माणसं अशी असतात,

जी आपल्या आयुष्याच्या प्रवासालाच सुंदर अर्थ देऊन जातात...

लेखिका :
**प्रा. दिपाली नारायण बागनाईक**
भूगोल प्राध्यापिका । लेखिका
डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय, पिंपरी, पुणे - १८

# केज मध्ये वर्षावास सोहळा : ग्रंथवाचन, धम्म प्रवचन संपन्न

**या सोहळ्यात प्रा.डॉ. बाबासाहेब हिरवे यांचा भारत सरकारच्या पेटेंट बद्दल तर डॉ.प्रविण सरवदे यांचा पीएचडी बद्दल गौरवपूर्ण सत्कार**

केज/प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा,केज शहर शाखेतर्फे आयोजित वर्षावास निमित्त नियमित ग्रंथवाचन व धम्म प्रवचन मालिके अंतर्गत नुकताच एक विशेष सत्कार सोहळा आणि धम्म प्रवचन कार्यक्रम उत्साहात पार पडला.स्थानिक वेळूवन बुद्ध विहार, भीमनगर,केज येथे झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात अगोदर तथागत गौतम बुद्ध,सम्राट अशोक व महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्रिवार पंचांग प्रणाम करून तसेच त्रिसरण व पंचशील ग्रहण करून करण्यात आली. यानंतर महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन करण्यात आले. आजच्या या मालिकेत 'बौद्ध धम्म आणि विज्ञान' या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर धम्म प्रवचन पार पडले,ज्याचा लाभ मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या उपासक-उपासिकांनी घेतला.बौद्धिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या केजमधील दोन गुणवंत प्राध्यापकांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला.यामध्ये पाण्यातील सूक्ष्म जीवांचे परीक्षण करणारे यंत्र विकसित केल्याबद्दल भारत सरकारचे पेटंट प्राप्त करणारे प्रा.डॉ.बी.जे. हिरवे सर,तर लोक प्रशासन विषयात 'ग्रामीण विकास प्रशासनातील दलित वस्ती सुधार योजनेतील लोकसहभागाचा विश्लेषणात्मक अभ्यास : विशेष संदर्भ बीड जिल्हा' या विषयावर पीएचडी पदवी प्राप्त करणारे प्रा.डॉ.प्रवीण दत्तात्रय सरवदे सर यांचा सन्मान करण्यात आला.सत्कार समारंभानंतर दोन्ही सत्कारमूर्तींनी आपल्या संशोधन कार्याबाबत सविस्तर माहिती दिली.प्रा.डॉ. बी.जे.हिरवे सर यांनी यावेळी आपल्या 'प्रज्ञासूर्य' व 'बाप' या प्रेरणादायी कवितांचे वाचन करून कार्यक्रमात एक वेगळे चैतन्य निर्माण केले.या मनोगतानंतर झालेल्या अध्यक्षीय भाषणात भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष जयपाल मस्के यांनी विहाराच्या माध्यमातून चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच या उपक्रमांमागील हेतू स्पष्ट केला.सोबतच, दोन्ही गुणवंत प्राध्यापकांचे मनःपूर्वक आभार मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुख्याध्यापक नंदकुमार मस्के यांनी केले.यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी चंद्रकांत मस्के,पत्रकार महेंद्र मस्के,कल्याण मस्के, दीपक मस्के,कपिल मस्के,माजी नगरसेवक गोपाळ मस्के,तसेच श्रीकांत हजारे,शैलेंद्र हजारे आणि महिला शाखेच्या सुरेखा मस्के, कुसुम मस्के,रत्नमाला मस्के,कौशल्या मस्के, अनिता गायकवाड, मैनाबाई मस्के,साखरे ताई,हौसाभाई हजारे, कलावती हजारे, सावित्राबाई कांबळे, वर्षा हजारे,शीतल लोमटे,सुनीता हजारे, आशा मस्के यांच्यासह बहुसंख्य बालक- बालिका व उपासक-उपासिका उपस्थित होते.या प्रेरणादायी सोहळ्याच्या शेवटी सरणत्तय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.





# सौ.संगीता दत्तात्रय वारे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

**केंद्रप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल प्रवीण मेहेरकर यांचा सत्कार**

आष्टी (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील अंबिकानगर (बुरुंजवस्ती) येथे युवा उद्योजक प्रवीण वारे यांच्या मातोश्री सौ. संगीता दत्तात्रय वारे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. सेवाकाळात त्यांनी बजावलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल उपस्थितांनी त्यांना शुभेच्छा देत भावी आयुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

या सोहळ्याच्या निमित्ताने प्रवीण मेहेरकर यांची केंद्रप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाची जबाबदारी मिळाल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी प्रवीण मेहेरकर यांचे अभिनंदन केले. त्यांच्या पुढील कार्यकाळात शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या अनुभवाचा निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार तथा विधिज्ञ सिताराम पोकळे, केंद्रीय मुख्याध्यापक रघुनाथ खंडागळे, पत्रकार शेख समीर यांच्यासह नातेवाईक, मित्रपरिवार, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवर व आप्तेष्टांनी सौ. संगीता दत्तात्रय वारे यांच्या सेवापूर्तीबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच प्रवीण मेहेरकर यांच्या केंद्रप्रमुखपदी झालेल्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करून नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सेवापूर्तीचा आनंद आणि नवीन जबाबदारीची उत्सुकता अशा दुहेरी आनंदाच्या वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे अंबिकानगर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

नातेवाईक, मित्रपरिवार, विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे सौ. संगीता दत्तात्रय वारे यांचा सेवापूर्ती सोहळा आणि प्रवीण मेहेरकर यांच्या सत्काराचा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला.

# जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-२०२६ चे आयोजन

## जिल्ह्यात गुंतवणूक आकर्षित करणे व रोजगार निर्मितीचा मुख्य उद्देश

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाच्या निर्देशानुसार बीड जिल्ह्यात बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. बार्शी रोडवरील हॉटेल ग्रँड यशोदा येथे ही परिषद पार पडणार आहे, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे सहायक आयुक्त किरण जाधव यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील स्थानिक गुंतवणूकदार, उद्योजक आणि व्यावसायिकांना एक हक्काचे व एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या परिषदेचा मुख्य हेतू आहे. याद्वारे जिल्ह्यात नवीन गुंतवणूक आकर्षित करणे, औद्योगिक विकासाला गती देणे आणि स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे यावर भर दिला जाणार आहे.

या परिषदेमध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीच्या विविध संधी. राज्यातील व जिल्ह्यातील उत्पादनांची आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्यात कशी वाढवावी. उद्योजकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजना, सवलती आणि पायाभूत सुविधा विषयावर सखोल माहिती व तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

बीड जिल्ह्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाला हातभार लावण्यासाठी जिल्ह्यातील संभाव्य गुंतवणूकदार, प्रस्थापित उद्योजक, व्यावसायिक तसेच उद्योग क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे सहायक आयुक्त किरण जाधव यांनी केले आहे.

# आंतरराष्ट्रीय रायफल शूटिंग चॅम्पियन कु.प्रणिता गायकवाड हिचा स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या वतीने भव्य सत्कार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आंतरराष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल करणारी आष्टी तालुक्यातील कु. प्रणिता नानासाहेब गायकवाड हिचा स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कडा यांच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात भव्य सत्कार करण्यात आला. तिच्या यशाचा गौरव करणारा हा प्रेरणादायी गुणगौरव सोहळा रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी मोरेश्वर मंगल कार्यालय, आष्टी येथे संपन्न झाला.

आदर्श माध्यमिक शिक्षक श्री. नानासाहेब गायकवाड यांची कन्या असलेल्या कु. प्रणिता गायकवाड हिने रायफल शूटिंग या क्रीडा प्रकारात आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आपल्या कौशल्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर तिने आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविले आहे. तिच्या या अभिमानास्पद कामगिरीमुळे क्रीडा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कडा यांच्या वतीने सभासदांच्या गुणवंत




पाल्यांचा गुणगौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात कु. प्रणिता गायकवाड हिचा विशेष सन्मान करण्यात आला. आष्टीच्या तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांच्या शुभहस्ते कु. प्रणिता गायकवाड व तिच्या पालकांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी माजी शिक्षणाधिकारी, परभणी तथा उच्च न्यायालयाचे वकील श्रीपाद देशपांडे, माजी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, सुप्रसिद्ध कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक संदीप पवार, स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, संचालिका श्रीमती शैला सातपुते, संचालिका श्रीमती मनीषा होळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कु. प्रणिता गायकवाड हिच्या यशाचे कौतुक करताना उपस्थित मान्यवरांनी तिच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि सातत्यपूर्ण सरावाचे विशेष अभिनंदन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही जागतिक स्तरावर चमकण्याची क्षमता आहे, हे प्रणिताने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. तिच्या यशामुळे आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या गुणगौरव सोहळ्यास तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक-शिक्षिका, शिक्षणप्रेमी नागरिक, पतसंस्थेचे सभासद, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, पतसंस्थेचे सर्व संचालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी कु. प्रणिता गायकवाड हिचे मनःपूर्वक अभिनंदन करून तिच्या भावी क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रणिता गायकवाड हिचा हा सन्मान केवळ एका गुणवंत खेळाडूचा गौरव नसून ग्रामीण भागातील प्रतिभेला प्रोत्साहन देणारा आणि नव्या पिढीला क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा देणारा ठरला.

# ॲड.प्रशांत सुभाषराव थोरवे यांची समर्थ सत्संग परिवारच्या विश्वस्तपदी निवड

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या व बीड व अहिल्यानगर जिल्ह्यात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या नामांकित 'समर्थ सत्संग परिवार' या सेवाभावी संस्थेच्या विश्वस्तपदी अहिल्यानगर येथील प्रसिद्ध युवा उद्योजक तथा कायदेतज्ज्ञ ड. प्रशांत सुभाषराव थोरवे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे संस्थेच्या सामाजिक आणि धार्मिक कार्याला आणखी नवी ऊर्जा व बळ मिळणार आहे.

नुकतीच अहिल्यानगर येथे 'समर्थ सत्संग परिवार'च्या विश्वस्त कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत संस्थेच्या मागील १० वर्षांतील सेवाकार्याचा आढावा घेण्यात आला. तसेच, आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर आखणी करण्यात आली. विशेषतः दादेगाव परिसरात आगामी काळात विविध प्रभावी समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा महत्त्वाचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. समर्थ सत्संग परिवार ही संस्था गेल्या एक दशकापासून सातत्याने रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण,गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप, कथा यात्रा यांसारखे विविध सांस्कृतिक व धार्मिक उपक्रम बीड व अहिल्यानगर जिल्ह्यात यशस्वीपणे राबवित आहे. संस्थेच्या या स्थापनेपासूनच्या प्रत्येक सेवाकार्यात सक्रिय योगदान देणारे अहिल्यानगर येथील प्रसिद्ध युवा उद्योजक ड. प्रशांत सुभाषराव थोरवे यांची संस्थात्मक कामकाजाचा अनुभव व सामाजिक जवळीक पाहून विश्वस्तपदी एकमुखाने निवड करण्यात आली. याच बैठकीत अहिल्यानगरचे सुप्रसिद्ध व्यावसायिक गणेशजी झंवर यांचीही विश्वस्त म्हणून निवड करण्यात आली.

दोन्ही नवीन विश्वस्तांच्या समावेशामुळे संस्थेच्या सेवाकार्याला अधिक गती व व्यापकता मिळेल, असा दृढ विश्वास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, समर्थ भक्त प.पू.श्री. मंदारमहाराज रामदासी यांनी याप्रसंगी व्यक्त केला. या बैठकी व निवडप्रसंगी संस्थेच्या सचिव सौ. शारदा होशिंग, उपाध्यक्षा श्रीमती शैलजा थोरवे, हिराकांत रामदासी, रविंद्र पिसोरे, डॉ. अनिकेत घोटणकर, हर्षद भावे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ड. प्रशांत थोरवे यांना तरुण वयातच लाभलेली सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याची आवड ही आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे.

त्यांच्या या राष्ट्रीय आणि सामाजिक स्तरावरील निवडीमुळे आष्टी तालुक्यातील, अहिल्यानगर येथील सर्व स्नेही, सामाजिक कार्यकर्ते व मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्यावर अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या व बीड व अहिल्यानगर जिल्ह्यात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या नामांकित 'समर्थ सत्संग परिवार' या सेवाभावी संस्थेच्या विश्वस्तपदी अहिल्यानगर येथील प्रसिद्ध युवा उद्योजक तथा कायदेतज्ज्ञ ड. प्रशांत सुभाषराव थोरवे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



# शिक्षण महर्षी,महाराष्ट्र भूषण तथा माजी आ.भीमराव धोंडे यांच्या

## वाढदिवसानिमित्त संस्थांतर्गत भव्य क्रीडा स्पर्धा संपन्न

## विद्यार्थ्यांना मिळाली क्रीडा कौशल्याची पर्वणी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षण क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविणारे शिक्षण महर्षी तथा महाराष्ट्र भूषण माजी आ. भीमराव धोंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ व आनंद शैक्षणिक संकुलाच्या वतीने संस्थांतर्गत भव्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य, जिद्द, चिकाटी आणि सांघिक भावना दाखवून दिली.

आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात माजी आ. भीमराव धोंडे यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळावी, त्यांच्यातील सुप्त गुणांना व्यासपीठ मिळावे आणि शिक्षणाबरोबरच क्रीडा, कला, संस्कार व व्यक्तिमत्त्व विकासालाही महत्त्व मिळावे, या व्यापक दृष्टिकोनातून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठे कार्य उभे केले आहे. त्यामुळेच आष्टी तालुक्यातील नागरिक त्यांना आदराने 'शिक्षण महर्षी' म्हणून संबोधतात.

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून आनंद शैक्षणिक संकुलांतर्गत विविध शैक्षणिक संस्था उभारून तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम भीमराव धोंडे यांनी केले आहे. आष्टी तालुक्यातील अनेक महत्त्वाच्या गावांमध्ये त्यांच्या शैक्षणिक संस्थांचे जाळे विस्तारले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना



आपल्या गावाच्या परिसरातच चांगल्या शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. बदलत्या काळाची गरज ओळखून विविध प्रकारचे अद्ययावत शिक्षण सुरू करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही संस्थेच्या माध्यमातून प्राधान्य दिले जात आहे.

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या शरीराचा, मनाचा आणि बुद्धीचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे, या विचारातून संस्थेच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रालाही विशेष प्रोत्साहन दिले जाते. त्याचाच एक भाग म्हणून माजी आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संस्थांतर्गत भव्य क्रीडा स्पर्धांकडे पाहिले जात आहे. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करण्याची आणि स्पर्धात्मक वातावरणाचा अनुभव घेण्याची मोठी संधी मिळाली.

या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. मैदानावर उतरताना विजयाची जिद्द, प्रतिस्पर्ध्याचा सन्मान, संघभावना आणि खेळाडूवृत्ती यांचे दर्शन घडले. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांना वाव दिला. त्यामुळे या स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम न ठरता त्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सांघिक भावनेला चालना देणारे व्यासपीठ ठरल्या.

विशेष म्हणजे, आपल्या वाढदिवसाचा उत्सव केवळ औपचारिक पद्धतीने साजरा न करता विद्यार्थ्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याची संकल्पना हीच भीमराव धोंडे यांच्या विद्यार्थीहितैषी विचारांची प्रचिती देणारी आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह आणि स्पर्धेत सहभागी होण्याची त्यांची धडपड ही या उपक्रमाचे खरे यश म्हणावे लागेल.

आष्टी तालुक्यात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवताना ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी भीमराव धोंडे यांनी दीर्घकाळ काम केले आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत पुढे गेले आहेत. शिक्षण संस्थांच्या माध्यमातून ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे.

त्यामुळेच शिक्षण महर्षी भीमराव धोंडे यांचा वाढदिवस विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला व्यासपीठ देऊन साजरा करण्याचा उपक्रम हा निश्चितच कौतुकास्पद ठरला आहे. अशा स्पर्धांमधून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या गुणवत्तेची ओळख निर्माण करण्याची संधी मिळते. भविष्यात याच विद्यार्थ्यांमधून तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर चमकणारे खेळाडू घडावेत, हीच या उपक्रमामागील सकारात्मक भूमिका आहे.शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी निर्माण केलेल्या शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम यामुळे माजी आ. भीमराव धोंडे यांचे व्यक्तिमत्त्व आष्टी तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या भव्य क्रीडा स्पर्धांनी विद्यार्थ्यांना आनंद, उत्साह आणि स्पर्धात्मकतेची पर्वणी मिळवून दिली असून, शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रालाही प्रोत्साहन देण्याचा सकारात्मक संदेश या उपक्रमातून मिळाला आहे.

# महिलांनी आरोग्यविषयक त्रास लपवू नये

## वेळेत तपासणी व उपचार घेण्याचे आ.सुरेश धस यांचे आवाहन

'ब्रेस्ट कॅन्सर'सारखा आजार अंगावर काढण्याचे दिवस आता गेले!

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कोणताही आजार लपवून न ठेवता वेळेवर निदान करून योग्य उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः महिलांमध्ये ब्रेस्ट कॅन्सरसारख्या आजाराबाबत अजूनही संकोच दिसून येतो; मात्र आजार अंगावर काढण्याचे दिवस आता गेले आहेत. महिलांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहून वेळेत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश आण्णा धस यांनी केले.

आष्टी तालुक्यातील एका आदर्श मातेच्या निधनानंतर आयोजित करण्यात आलेल्या श्रद्धांजली कार्यक्रमात आ. सुरेश धस बोलत होते. यावेळी त्यांनी आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित करत महिलांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त केली.

आष्टी येथे झालेल्या आरोग्य शिबिराचा संदर्भ देताना आ. सुरेश धस यांनी सांगितले की, आष्टी येथे पार पडलेल्या आरोग्य शिबिरात १५० महिलांची मॅमोग्राफी तपासणी करण्यात



आली. त्यापैकी १६ महिलांमध्ये या आजाराची शक्यता असू शकते, असा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे महिलांनी आरोग्याच्या बाबतीत अधिक सतर्क राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ब्रेस्ट कॅन्सरसारख्या आजाराचे वेळीच निदान झाल्यास त्यावर योग्य उपचार करणे शक्य होते. त्यामुळे महिलांनी कोणताही आरोग्यविषयक त्रास लपवून न ठेवता आपल्या कुटुंबातील जवळच्या व्यक्तीला किंवा थेट डॉक्टरांना त्याबाबत माहिती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

# भगवानगडाचे महंत डॉ.नामदेव शास्त्रीजींची आ.सुरेश धस यांनी घेतली रुग्णालयात भेट

## अँजिओप्लास्टीनंतर प्रकृतीत सुधारणा;शास्त्रीजींच्या प्रकृतीची आस्थेने केली विचारपूस

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) भगवानगडाचे महंत तथा अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर डॉ. नामदेव शास्त्रीजी यांना काही दिवसांपूर्वी अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने वैद्यकीय उपचारासाठी अहिल्यानगर येथील डॉ. संदीप गाडे यांच्या इम्पल्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या विविध वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्यांदरम्यान त्यांच्या हृदयामध्ये ब्लॉकेज असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार त्यांच्यावर अँजिओप्लास्टीची प्रक्रिया करण्यात आली.

अँजिओप्लास्टीची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर डॉ. नामदेव शास्त्रीजी यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असून सध्या त्यांची प्रकृती व्यवस्थित आणि स्थिर असल्याची माहिती आहे. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर पुढील उपचार व आवश्यक वैद्यकीय निगा राखली जात आहे. उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीत सकारात्मक सुधारणा झाल्याने त्यांच्या अनुयायी, भक्तगण तसेच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, मराठवाडा भूषण, लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांनी अहिल्यानगर येथील इम्पल्स हॉस्पिटलमध्ये जाऊन भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्रीजी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. आ.



सुरेश धस यांनी शास्त्रीजींची आस्थेने विचारपूस करून त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. तसेच त्यांच्या उपचाराबाबत डॉक्टरांशी चर्चा करून वैद्यकीय स्थितीची माहिती जाणून घेतली.

यावेळी आ. सुरेश धस यांनी डॉ. नामदेव शास्त्रीजी यांच्याशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. अचानक उद्भवलेल्या या आरोग्याच्या प्रसंगानंतर त्यांनी दाखविलेली आत्मीयता आणि आपुलकी यामुळे रुग्णालयातील वातावरणातही भावनिक क्षण निर्माण झाला. शास्त्रीजींच्या प्रकृतीत लवकरात लवकर पूर्ण सुधारणा व्हावी आणि त्यांना उत्तम आरोग्य लाभावे, यासाठी आ. सुरेश धस यांनी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या.

भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्रीजी यांचे अध्यात्मिक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने मोठ्या संख्येने भाविक व अनुयायी जोडलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती समोर आल्यानंतर अनेक भक्त, अनुयायी आणि हितचिंतकांकडून त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात होती. अँजिओप्लास्टीनंतर त्यांची प्रकृती स्थिर असून सुधारणा होत असल्याची माहिती मिळाल्याने सर्वांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

आ. सुरेश धस यांनी यावेळी शास्त्रीजींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होऊन त्यांनी पुन्हा पूर्ण उत्साहाने आपल्या अध्यात्मिक, सामाजिक आणि जनजागृतीच्या कार्याला सुरुवात करावी, अशी सदिच्छा व्यक्त केली. तसेच त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देत लवकरात लवकर पूर्णपणे बरे होण्याची कामना केली. या भेटीप्रसंगी डॉ. संदीप गाडे, दीपक तांबे आणि महादेव जायभाय उपस्थित होते. डॉ. संदीप गाडे यांनी डॉ. नामदेव शास्त्रीजी यांच्या उपचारासंदर्भात आवश्यक माहिती दिली. उपस्थितांनीही शास्त्रीजींच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. डॉ. नामदेव शास्त्रीजी यांची प्रकृती आता स्थिर असून उपचारानंतर त्यांच्यात सुधारणा होत आहे. त्यामुळे भक्तगण, अनुयायी आणि हितचिंतकांनी चिंता न करता त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

भगवानगडाच्या माध्यमातून अध्यात्मिक, सामाजिक आणि समाजप्रबोधनाचे कार्य करणाऱ्या डॉ. नामदेव शास्त्रीजी यांना उत्तम आरोग्य लाभावे आणि ते लवकरात लवकर पूर्णपणे निरोगी होऊन आपल्या कार्यक्षेत्रात पुन्हा सक्रिय व्हावेत, यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.







# महसूल दिनी अर्धापूर तालुक्यातील इंगळे, पन्नासे सन्मानित

अर्धापूर (प्रतिनिधी) : कै. शंकरराव चव्हाण सभागृह, नांदेड येथे महसूल दिनानिमित्त सन २०२५-२६ या वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमात अर्धापूर तहसील कार्यालयांतर्गत उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी दाभड सज्जाचे मंडळ अधिकारी राजु इंगळे, लहान येथील पोलीस पाटील आनंद इंगळे व कोतवाल अंकूश पन्नासे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

गेल्या वर्षभरात महसूल विषयक कामांमध्ये दाखवलेली तत्परता, पारदर्शकता, जनसेवेची भावना तसेच शासकीय कामातील अचूकता याबद्दल महसूल विभागाच्या वतीने मंडळ अधिकारी राजु इंगळे, पोलीस पाटील आनंद इंगळे व कोतवाल अंकूश पन्नासे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील,अप्पर जिल्हाधिकारी रत्नदिप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर,उपविभागीय अधिकारी डॉ.संजय खल्लाळ,तहसीलदार रेणूकादास देवणीकर आदींची यावेळी उपस्थिती होती. आपल्या कर्तव्यनिष्ठ कामामुळे अर्धापूर तहसीलचे नाव उज्ज्वल करणाऱ्या इंगळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# कुंटूर पोलिसांचा जुगार अड्ड्यावर छापा; पाच जणांवर गुन्हा

३ लाख १३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त; दोन दुचाकी, मोबाईलसह रोकड हस्तगत

नायगाव तालुक्यातील सुजलेगाव शेतशिवार, ता. नायगाव येथे सुरू असलेल्या 'तिर्रट' नावाच्या जुगार अड्ड्यावर कुंटूर पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत पाच जणांना ताब्यात घेत त्यांच्याकडून रोख रक्कम, दोन दुचाकी, मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकूण ३ लाख १३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नांदेड जिल्ह्यात जुगार, मटका व इतर अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम सुरू आहे. या मोहिमेंतर्गत ८ ऑगस्ट रोजी कुंटूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली.

कुंटूर पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना गुप्त बातमीदारामार्फत सुजलेगाव शेतशिवारात काही इसम 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिस निरीक्षक विशाल भोसले यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पंचांसमक्ष सापळा रचून कारवाई केली असता संशयित जुगार खेळताना आढळून आले.

या कारवाईत रवीराज उत्तम जुकरे (वय २७, रा. सुगाव, ता. देगलूर), सुनील माधवराव उच्चे (वय २५, रा.




करे मलकापूर, ता. देगलूर), साईराज पी. रामकिशन कदम (वय २९, रा. सुजलेगाव, ता. नायगाव), अभिषेक हंगे (वय २७, रा. सुजलेगाव, ता. नायगाव) आणि लक्ष्मण किशनराव तरकंटे (वय ३३, रा. सुजलेगाव, ता. नायगाव) यांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी संशयितांकडून रोख २१ हजार ७०० रुपये, दोन मोटारसायकली व एक बुलेट (किंमत २ लाख २० हजार रुपये), चार मोबाईल (किंमत ७२ हजार रुपये) तसेच जुगाराचे साहित्य, असा एकूण ३ लाख १३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त केला.

या प्रकरणी कुंटूर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २०३/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशाने, सपोनि विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ कांबळे, पवार पोहेकॉ, सप्रिल हंबर्डे व कुंटूर पोलिस ठाण्यातील नियुक्त पोलिस कर्मचाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले

जुगार, मटका, अवैध दारू, अमली पदार्थ तसेच इतर अवैध धंद्यांविरोधात नांदेड जिल्हा पोलिसांनी कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात असे अवैध प्रकार सुरू असल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यशाचे शिखर गाठावे-आ.सुरेश आण्णा धस

## विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका ठरणार 'अभ्यास संजीवनी'

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत यश संपादन करण्याची जिद्द, क्षमता आणि आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. स्पर्धा परीक्षांसाठी आज सर्वत्र पोषक वातावरण उपलब्ध होत असून, ग्रामीण विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेत यशाचे शिखर गाठावे, असे आवाहन आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश आण्णा धस यांनी केले.

आष्टी येथे तरुण आयान अनिस पठाण यांनी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुरू केलेल्या अभ्यासिकेच्या उद्घाटनप्रसंगी आ. सुरेश आण्णा धस बोलत होते. त्यांच्या हस्ते फीत कापून अभ्यासिकेचे उद्घाटन करण्यात आले.

आ. सुरेश आण्णा धस म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये यश संपादन करण्याची ताकद पूर्वीपासूनच आहे आणि आजही ती कायम आहे. मात्र, स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांना शांत, निवांत आणि अभ्यासासाठी पोषक वातावरणाची आवश्यकता असते. लातूरच्या धर्तीवर आष्टी व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी आयान अनिस पठाण यांनी सुरू केलेले हे स्टडी सेंटर निश्चितच उपयुक्त ठरेल. या अभ्यासिकेत मुला-मुलींना एकाग्रतेने अभ्यास करता येईल.





केलेला अभ्यास कायमस्वरूपी स्मरणात राहण्यासाठी निवांत व अभ्यासपूर्ण वातावरण महत्त्वाचे आहे. या अभ्यासिकेच्या माध्यमातून आष्टी व परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोठी मदत मिळेल. आयान पठाण यांनी सुरू केलेली ही अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी 'अभ्यास संजीवनी' ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन आणि हाजी सय्यद हबीब हुसेन यांनी आ. सुरेश आण्णा धस यांना आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांचे 'मंतरलेले दिवस' हे पुस्तक भेट देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, आपली मुले डोंगराळ आणि ग्रामीण भागातील असली, तरी ती मनाने आणि शरीराने सुदृढ आहेत. या भागातूनच पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने आणि तुकाराम मुंडे यांसारख्या कर्तृत्ववान व्यक्ती घडल्या आहेत. मराठवाड्याच्या मातीने येथील माणसांमध्ये जिद्द, संघर्षाची प्रेरणा आणि परिस्थितीवर मात करण्याची ताकद रुजवली आहे.

एकांत आणि शांत वातावरणाचे महत्त्व स्पष्ट करताना प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील प्रसंगाचा संदर्भ दिला. स्वामी विवेकानंदांनी कन्याकुमारीसारख्या ठिकाणी एकांतात बसून जगाचा आणि मानवकल्याणाचा विचार केला. त्याचप्रमाणे हजरत मोहम्मद पैगंबर हे गार-ए-हिरा गुहेत एकांतात चिंतन करत असत. एकांत, निवांतपणा आणि चिंतन यामधून व्यक्तीला आपल्या ध्येयाकडे अधिक एकाग्रतेने वाटचाल करता येते. विद्यार्थ्यांसाठीही शांत आणि निवांत वातावरण अनेक सकारात्मक गोष्टी देऊन जाते, असे त्यांनी सांगितले.

या उद्घाटन सोहळ्यात अभ्यासिकेचे संचालक आयान अनिस पठाण, त्यांचे आजोबा हयात खान पठाण, परिवारातील नासेर पठाण, डॉ. अनिस पठाण आणि इम्रान पठाण यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

कार्यक्रमास नगराध्यक्ष जियाभाई बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, सुखलालजी मुथा, रंगनाथ धोंडे, शरीफ भाऊ शेख, डॉ. नदीम शेख, अज्जू भाई शेख, हिराभाऊ केरूळकर, अशोक मुळे, ज्ञानदेव राऊत, मुक्ती शफिक साहेब, मुस्ती अफजल साहेब, महादेव शिकरे, जालिंदर वांढरे, डॉ. सय्यद हुमायुद्दीन, आस्ताक शेख, राख सर, उदय गोल्हार सराफ, नाजीम शेख, श्याम वाल्हेकर, पत्रकार संतोष सानप, चोंडे सर, झांबरे सर, समीर शेख, सुरेश वारंगुळे, इरशान खान यांच्यासह आष्टी शहर व परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अनिस पठाण यांनी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचे आभार मानले. आष्टीसारख्या ग्रामीण भागात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र आणि अभ्यासपूर्ण वातावरण उपलब्ध करून देण्याचा आयान अनिस पठाण यांचा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच चालना देणारा ठरणार असल्याचे उपस्थितांनी व्यक्त केले.

# मालेगावच्या विकासाचे तीनतेरा;
# मूलभूत सुविधांसाठी नागरिकांची फरफट



अर्धाच (प्रतिनिधी): विकासाच्या गप्पा आणि प्रत्यक्षातील विदारक परिस्थिती यातील विरोधाभास अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथील शाळा,दवाखाने,विविध शासकीय कार्यालये ग्रामपंचायतीच्या विविध वॉर्डामध्ये ठळकपणे दिसून येत आहे. रस्त्यावर साचलेले सांडपाणी, ठिकठिकाणी पडलेले कचऱ्याचे ढीग आणि तुंबलेल्या नाल्यांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेक दिवसांपासून नाल्यांची साफसफाई न झाल्याने परिसरात दुर्गंधी आणि डासांचा प्रचंड उपद्रव वाढला आहे.

पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर झाली असून सांडपाणी रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना त्यातूनच मार्ग काढावा लागत आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना अस्वच्छ वातावरणाचा सामना करावा लागत आहे. संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला असतानाही ग्रामपंचायत प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

‘कार्यकाळ संपला’ म्हणत जबाबदारी झटकली?

नागरिकांनी समस्यांबाबत लोकप्रतिनिधींना जाब विचारला असता, ‘आमचा कार्यकाळ संपला आहे’ असे उत्तर मिळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, समस्या सुटेपर्यंत जबाबदारी कोणाची, असा सवाल आता उपस्थित होत आहे. अधिकार आणि प्रशासनाची यंत्रणा अस्तित्वात असतानाही नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांपासून पळ काढला जात असल्याची संतप्त भावना परिसरात व्यक्त होत आहे.

१३ कोटींच्या जलजीवन मिशननंतरही नळ कोरडेच!

जलजीवन मिशनअंतर्गत गावात तब्बल १३ कोटी रुपयांचा खर्च झाल्याचे सांगितले जाते. मात्र, एवढा मोठा निधी खर्च झाल्यानंतरही अनेक घरांमध्ये नळाला पाणी मिळत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. दुसरीकडे गावातील अनेक रस्त्यांची अवस्था बिकट असून त्यांची दुरुस्तीही झालेली नाही. त्यामुळे ‘१३ कोटींचा निधी नेमका कुठे खर्च झाला? विकास कागदावर झाला की प्रत्यक्षात?’ असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. जलजीवन मिशनच्या कामांची गुणवत्ता, खर्च आणि प्रत्यक्ष लाभार्थी यांची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

कर भरतो आम्ही; सुविधा कुठे?

ग्रामस्थांकडून कर वसूल केला जातो; मग त्याबदल्यात स्वच्छ नाल्या, नियमित कचरा संकलन, शुद्ध पाणी आणि चांगले रस्ते मिळणे हा नागरिकांचा अधिकार नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे. ग्रामपंचायतीच्या हद्दीत मूलभूत नागरी सुविधांचीच वानवा असेल तर विकासाच्या घोषणा कशासाठी, असा संतप्त सवालही नागरिकांनी केला आहे.

मालेगावच्या नागरिकांचा संयम आता संपत चालला असून संबंधित प्रशासनाने तातडीने नाल्यांची साफसफाई करावी, डास प्रतिबंधक फवारणी करावी, कचरा हटवावा, खराब रस्त्यांची दुरुस्ती करावी तसेच जलजीवन मिशनअंतर्गत झालेल्या कामांची व खर्चाची चौकशी करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

गावाचा विकास केवळ फलकावर दिसून चालणार नाही; तो प्रत्येक नागरिकाच्या दारापर्यंत आणि प्रत्यक्ष जीवनात पोहोचला पाहिजे, अशी अपेक्षा आता मालेगावकर व्यक्त करीत आहेत.

# आडीच क्विंटल गोमांस मनाठा पोलिसांनी पकडले; गाडी सोडून आरोपी गेले पळुन




मनाठा पोलिसांची उत्तम कामगिरी.. ३० रिकमी पाठलाग करून जप्त केली गाडी..

तामसा (प्रतिनिधी )दिनांक ९अगस्त सकाळी ११२ वर कॉल करुन मनाठा पोलिसांना माहिती देण्यात आली की ईरटीका कारमध्ये गोमांस हदगाव कडुन वारंगा जात आहे.त्यामुळे मनाठा पोलिसांनी मनाठा पाटी येथे बॅरिकेट्स लाऊन वाहनाची तपासणी केली असता एका कारने बॅरिकेट्स उडवुन भरधाव वेगाने वारंगाकडे पलायन केले परंतु पोलिसांनी पाठलाग करीत वारंगा येथिल नयीआबादी येथे वाहन सोडुन आरोपी पळाले वाहनात २४० किलो गोमांसाचे आठ पोते आढळुन आले असुन गोमांस जप्त करण्यात आले आहे. आज सकाळी पाच वाजता सुप्रभातगस्त पेट्रोलींग करीत असताना ५:४८ मिनीटाला ११२ वर कॉल आला.हदगाव वारंगा असा प्रवास करत असलेली एंटीगा कारने गोमांस जात असल्याचे पोलिसांना सांगितले.लगेच बॅरिकेट्स लाऊन वाहनाची तपासणी करीत असताना एक एंटीगा कार भरवेगात येत असल्याचे पोलीसांना दिसले त्यांना थांबण्याचा इशारा केला असता ते बॅरिकेट्स उडवुन भरधाव वेगाने वारंगाकडे पलायन केले.मनाठा पोलिसांनी शासकीय वाहनातुन त्यांचा पाठलाग केला असता वारंगा येथिल नयीआबादी येथे मानव वस्ती कार ईरटीका क्र. चक४६इट६४३५घेऊन अज्ञात चालक व एक इसम वाहन सोडुन पळाले. ज्या लोकांनी ११२ वर पोलिसांनी माहीती दिली होती ते खाजगी वाहनाने त्या ईरटीका कारचा पाठलाग करीत घटनास्थळी पोहोचले त्या जप्त केलेल्या कारमध्ये २४० किलो गोमांस वेगवेगळ्या आठ पोत्यात बांधुन असल्याचे आढळले २५० रुपये प्रति क्विंटल प्रमाणे ६०’००० रुपये व ७,लाख रुपये किंमतीची कार जप्त करण्यात आली असुन फिर्यादी अमोल नागरगोजे पोलीस शिपाई यांच्या फिर्यादीवरून मनाठा पोलीस स्टेशन मध्ये अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास आशोक दाढे बिट जमादार सपोनी विलास चवळी यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

# प्रलंबित नियोजित वाघाळा स्मशानभूमी जागेची मनपा प्रशासन कडून पाहणी,भाजपा नगरसेवक संजय पाटील घोगरे यांच्या पुढाकार

नवीन नांदेड – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत असलेल्या वाघाळा स्मशानभूमी शेड करण्यासाठी भाजपा नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी आयुक्त महेश डोईफोडे यांच्या कडे प्रत्यक्ष भेटून निवेदन दिल्यानंतर १० ऑगस्ट रोजी मनपाचे शहर अभियंता दिलीप टाकळीकर, कनिष्ठ अभियंता ठाणेदार यांनी पाहणी केली असून या स्मशानभूमी साठी मनपा अर्थसंकल्प किंवा जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ही स्मशानभूमीत विकसीत होणार असुन अखेर स्मशानभूमी विकसित होण्याचा जवळपास प्रश्न मिटला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून वाघाळा मधील गावठाण जागेवर स्मशानभूमी जागा असुन या सर्व जागेवर अंत्यसंस्कार करण्यासाठी मोकळ्या जागेवरच अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत, स्मशानभूमी लगत वस्ती वाढ होत असल्याने उघड्यावर होत असलेल्या अंत्यसंस्कार जाणाऱ्या येणाऱ्या वाहनधारकासह नागरीकांचे लक्ष्य वेधले जात असून या ठिकाणी त्वरित स्मशानभूमी साठी शेड उभारून जागा विकसित करावी यासाठी ७ जुलै रोजी मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्यी प्रत्यक्ष भेट भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी घेऊन निवेदन दिले.

मर दथ विभाग अभियंता दिलीप टाकळीकर व कनिष्ठ अभियंता ठाणेदार यांनी १० ऑगस्ट रोजी स्मशानभूमी जागेची

पाहणी केली यावेळी नगरसेवक संजय पाटील घोगरे यांच्या माजी नगरसेवक संजय इंगेवाड,राजु पाटील घोगरे, साहेबराव काळेवाड,बालाजी घोगरे, सदाशिव घोगरे, महेश काळेवाड, भिमराव घोगरे, तुळशिराम घोगरे, सतिश घोगरे,अंनिस घोगरे,दिगांबर घोगरे,यांच्या सह गावातील नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सदरील स्मशानभूमी विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद निधीतून किंवा जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्यात येणार असल्याचे शहर अभियंता दिलीप टाकळीकर यांनी सांगितले असून गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला स्मशानभूमी प्रश्न भाजपा नगरसेवक संजय पाटील घोगरे यांच्या पुढाकाराने सुटणार आहे.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त तामसा प्राथमिक आरोग्य केंद्रात ८३ गरोदर मातांची तपासणी

## प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

तामसा –(प्रतिनिधी )जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून प्राथमिक आरोग्य केंद्र तामसा येथे प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत परिसरातील गरोदर मातांसाठी विशेष आरोग्य तपासणी व मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. उपक्रमाला महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ८३ गरोदर मातांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आदिवासी क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन माजी उपसभापती शंकर मेंडके यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर गरोदर मातांच्या आरोग्य तपासणी झाली. यात गरोदर मातांची रक्तदाब, वजन, उंची, रक्त व लघवी तपासणी, तसेच गर्भाची वाढ, गर्भाच्या हृदयाचे ठोके यांची तपासणी करून उच्च जोखमीच्या गरोदर मातांची ओळख करण्यात आली. आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा उपलब्ध करून दिल्या. गरोदर मातांना संतुलित आहार, प्रसूतिपूर्व काळजी, नियमित आरोग्य तपासणी आणि गर्भावस्थेत घ्यावयाच्या आवश्यक खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. हदगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे यांनी गरोदर मातांना संतुलित आहार, प्रसूतिपूर्व काळजी, नियमित आरोग्य तपासणी आणि गर्भावस्थेत घ्यावयाच्या आवश्यक खबरदारी, गरोदर मातांना गर्भावस्थेतील काळजी, नियमित तपासणीचे महत्त्व आणि सुरक्षित प्रसूतीसाठी आवश्यक बाबींबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे नियोजन तामसा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी सूर्यवंशी यांनी उत्कृष्ट पद्धतीने केले. त्यांच्या नियोजनातून ८३ गरोदर मातांची तपासणी सुरळीतपणे पार पडली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व आरोग्य कर्मचारी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य केले.

मातृआरोग्याला प्राधान्य देत सुरक्षित मातृत्वाचा संदेश

गरोदरपणातील नियमित तपासणी, योग्य आहार आणि वेळेवर उपचार यामुळे माता व बाळाचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यास मोठी मदत होते. त्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील गरोदर मातांपर्यंत आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे यांनी सांगितले.

# पांडुरंग महोत्सवासाठी शेकडो दिंड्या ताहाराबाद कडे ;
# प्रतीपंढरी ताहाराबाद महोत्सव सुरू

अहिल्यानगर ( प्रशांत बाफना ) राहुरीतालुक्यातील प्रतीपंढरी म्हणून समजल्या जाणार्या श्रीक्षेत्र ताहाराबाद येथे पांडुरंग महोत्सवासाठी आज धाकट्या एकादशीला वैष्णवांचा जणू मेळा जमला आहे.आज कामिनी एकादशीला ताहाराबाद येथे शेकडो दिंड्यांचे आगमन झाले . ११ ऑगष्ट रोजी दहीहंडी तर १३ ऑगस्टला नयनरम्य पाऊलघडीचा सोहळा आयोजित केला आहे .सोहळ्यासाठी भाविकांची मोठी मांदियाळी येथील संत कवी महिपती महाराज समाधी मंदिराच्या परिसरात दिसत आहे.

श्री संत कवी महिपती महाराजांच्या भेटीसाठी पंढरीचा पांडुरंग सालाबादप्रमाणे श्रीक्षेत्र ताहाराबादला येणार म्हणून पंचक्रोशी भक्तीभावात रंगून गेली आहे. पायी दिंडी सोहळ्याच्या स्वागतासाठी परिसरातील भाविक सज्ज झाले आहेत.

आषाढ वद्य नवमीला ताहाराबाद येथे पांडुरंगाचे आगमन होते . सालाबादप्रमाणे वैकुंठवासी ब्रह्मलीन नाना महाराज वनकुटेकर (सोबळेवाडी) पायी दिंडी सोहळा ताहाराबादला पोहोचतो . या सोहळ्याला अतिशय मानाचे स्थान आहे. महाभिषेक, भिक्षा कार्यक्रम, काकड आरती, नैवेद्य, हरिपाठ व दिंड्यांचे स्वागत आदी कार्यक्रम होतात.

पंढरपूर निवासी पांडुरंगाचे ताहाराबादला महिपती महाराजांच्या भेटीसाठी आगमन होताच राज्यातील बहुसंख्य पायी दिंडी पालख्यांचेही रविवार ९ ऑगस्टला कामिका एकादशीच्या पर्वणीला ताहाराबादला आगमन झाले आहे .

सोमवार दि. १० ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्रात रामदास महाराज क्षीरसागर तर रात्री ८ वा. आदिनाथ महाराज शास्त्री (तारकेश्वर गड) यांची कीर्तन सेवा होईल. मंगळवार दि. ११ ऑगस्ट रोजी १० वा. संत कवी महिपती महाराज



पायी दिंडी सोहळ्याचे उपाध्यक्ष बाळकृष्ण महाराज कांबळे यांचे काल्याचे कीर्तन होईल. दुपारच्या सत्रात ३ वा. देवस्थानचे मठाधिपती अर्जुन महाराज तनपुरे यांचे पांडुरंग महोत्सवाचे काल्याचे कीर्तन होऊन नयनरम्य दहीहंडीने सोहळ्याची सांगता होणार आहे.बुधवार दि. १२ ऑगस्ट रोजी छबीना मिरवणूक, पूजा, नैवेद्य, आरती व शिळा गोपाळकाला तर गुरुवार दि. १३ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वा. पाऊलघडीच्या कार्यक्रमाने पांडुरंग महोत्सवाची सांगता होणार आहे.या महोत्सवात ज्ञानदान व अन्नदानाचा उच्चांक होत असतो. ताहाराबाद क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष असतानाही लाखो भाविकांची उत्तमोत्तम व्यवस्था दरवर्षी होत असते. ७ दिवस अखंड चहा, नाष्टा, अन्नदान सुरु असते. साधारण ७ – ८ लाखावर भाविक या महोत्सवात सहभाग नोंदवतात. या महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थानचे वतिने करण्यात आले आहे



न्याहळोद–धुळे तालुक्यातील न्याहळोद येथील रहिवासी कैलास उर्फ शाना पंडित माळी यांना आदिवासी विकास संघाच्या वतीने रविवार दि.९ ऑगस्ट रोजी,आदिवासी दिनाचे औचित्य साधून,आदिवासी विकास संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.मोतीलाल सोनवणे व पदाधिकारी माजी सरपंच अण्णा पवार,गोविंदा बोरसे,परमेश्वर भिल, भास्कर सावळे,सुखराज भिल,आशाबाई शामू भिल,आशाबाई रोहिदास भिल यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार शाल,श्रीफळ,गुलाब पुष्प व सन्मानपत्र देऊन प्रदान करण्यात आला.

कैलास माळी हे एक प्रेमळ, निर्मळ व उदार व्यक्तिमत्व म्हणून गावात ख्याती आहे.सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य अत्यंत निष्ठेपूर्वक केले आहे.गावात कुठल्याही जाती धर्माची व्यक्तीचे निधन झाल्यास मर्तिका विधीसाठी लागणारे साहित्य तसेच डोली सजवणे हे काम ते निष्ठेपूर्वक व प्रामाणिकपणे करतात.त्यांचे कार्य खरोखर प्रशंसनीय आहे.म्हणून त्यांना जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला.म्हणून त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव आहे.

# ‘शिक्षणाचा वसा जोपासा, स्वअस्तित्व टिकवा’ ; आमदार भीमराव केराम

जागतिक आदिवासी दिनानिमित्त किनवटमध्ये हजारोंची भव्य रॅली; बिरसा मुंडा चौकात अभिवादन

किनवट प्रतिनिधी दि.०९ : जागतिक आदिवासी दिनानिमित्त किनवट शहरात आदिवासी अस्मिता, संस्कृती व परंपरेचा भव्य जागर करण्यात आला. शहरातून काढण्यात आलेल्या रॅलीत आदिवासी समाजबांधव, विद्यार्थी, महिला व नागरिकांनी हजारोंच्या संख्येने सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषा, ढोल–ताशांचा गजर व आदिवासी नृत्याने शहर दुमदुमून गेले. रॅलीचा समारोप बिरसा मुंडा चौकात झाला. यावेळी आमदार भीमराव केराम यांच्यासह मान्यवरांनी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम व मुख्य सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना आमदार भीमराव केराम यांनी स्वअस्तित्व टिकवायचे असेल तर महापुरुषांचे विचार व आदर्श समोर ठेवून शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. शिक्षण, संघटन आणि विकासाच्या माध्यमातून समाजाने पुढे जावे, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी शासकीय सवलतींवर अवलंबून न राहता स्वावलंबी व सक्षम बनण्याचा प्रयत्न करावा, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात आदिवासी पारंपरिक नृत्य व सांस्कृतिक सादरीकरणातून आदिवासी समाजाच्या समृद्ध परंपरा, निसर्गाशी असलेले नाते, संघर्ष आणि आत्मसन्मानाचा जागर करण्यात आला. यावेळी युवा नेते संदेश केराम, माजी नगराध्यक्ष के मूर्ती, आनंद मच्छेवार, साजिद खान, आदिवासी नेते गोपीनाथ बुलबुले, डॉ. ढोले, डॉ. उत्तम धुमाळे, आदिवासी सेवक दादाराव टेकाम, माजी जिल्हा



परिषद अध्यक्ष जनाबाई डुडुळे, काँग्रेस नेत्या नंदिनी टारपे, माजी सभापती दत्ता आडे, नगरसेवक संतोष महसकोल्हे, यशवंत कराळे पाटील, रमेश बद्दीवार, शेख रफिक, संतोष कनाके, स्वीय सहाय्यक प्रकाश कुडमते तसेच पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्यासह किनवट–माहूर तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजन समितीचे अध्यक्ष संतोष मरस्कोले यांनी केले. सूत्रसंचालन विजय कुमरे, तर आभार विजय पेंदोर यांनी मानले. वीर बाबुराव शेडमाके उत्सव समिती, किनवट–माहूर यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# बीड शहरात विकासकामांचा धडाका, रस्ते, नाल्या व सभागृहाच्या कामांना सुरुवात

## प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावणार – डॉ. योगेश क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

बीड विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गाव, शहर व वस्तीपर्यंत मूलभूत सुविधा पोहोचविणे हेच आमचे ध्येय आहे. वीज, रस्ते, नाली, सभागृह आदी नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित कामांना प्राधान्य देण्यात येत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून अधिकाधिक विकासनिधी आणून प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही भाजपचे बीड विधानसभा मतदारसंघाचे नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दिली.

बीड शहरातील माने कॉम्प्लेक्सजवळील विविध विकासकामांच्या भूमिपूजन व उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पारनेरकर महाराज मठ परिसरातील



सिमेंट रस्ता व नाली बांधकाम, पवनसुत मंगल कार्यालयामागील कॉलनीतील सिमेंट रस्ता व नाली बांधकाम, जवाहर कॉलनीतील अंतर्गत सिमेंट रस्ते व नाली बांधकाम तसेच आदर्श गणेशनगर येथील श्री हनुमान मंदिर परिसरातील सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर, भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर, ज्येष्ठ विधिज्ञ ड. विवेकानंद सानप, नगरसेवक सनी माने, नानासाहेब काकडे, आप्पा जगताप, राजाभाऊ गुजर, ड. नागेश तांबारे, सरपंच अंबादास गुजर, भाजप नेत्या डॉ. ज्योती घुंबरे, तसेच डॉ. अशोक सानप, बाळासाहेब गुजर, एस. टी. तांदळे, रवी सोनवणे, संदीप तांदळे, विशाल खाडे, मंगेश धोंगडे, विशाल तांदळे, एन. बी. चौरे, शिवाजी तिडके, संग्राम बांगर, अनिकेत सानप, संदेश खेडकर, एल. डी. चौरे, शहादेव शिंदे, सचिन सानप, प्रसाद मुंडे, उषाताई मुंडे, आशा तांदळे, मोराळे, उषा खाडे, संजीवनी घोडके यांची उपस्थिती होती.

तसेच आनंदनगर येथील सिमेंट रस्ता व नाली बांधकाम आणि कॅनरा बँक कॉलनीतील श्रीराम मंदिर परिसरातील कंपाउंड वॉल व पेव्हर ब्लॉक कामाचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेविका समीक्षा मुन्ना गायकवाड, नगरसेवक सय्यद मुस्तफा, तसेच विठ्ठल गुजर, डॉ. रमेश शिंदे, तेजस दूनघव यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध विकासकामांमुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले रस्ते व नालीचे प्रश्न मार्गी लागणार असून, शहराच्या विकासाला गती मिळणार आहे.

# संभाजीनगरमध्ये बोगस परीक्षा

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून देशात होणाऱ्या परीक्षांबाबत धक्कादायक खुलासे होत आहेत. नीट पेपरफुटीनंतर महाराष्ट्रात टीईटी परीक्षेचा पेपर फुटला. पेपरफुटीमुळे विद्यार्थी, पालक त्रस्त असताना आता तर थेट बोगस परीक्षेचा प्रकार उघडकीस आल्याने सर्वत्र खळबळ उडाली. नोकरीचे आमिष दाखवून परीक्षेच्या नावाखाली हजारो विद्यार्थ्यांकडून पैसे उकळत मोठी फसवणूक झाल्याचा प्रकार आज छ. संभाजीनगरमध्ये घडला. या बोगसगिरीमुळे विद्यार्थी, पालकांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून, संतप्त तरुणांनी परीक्षा केंद्रावरच गोंधळ घातला. त्यामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

विमानतळावर आकर्षक नोकरी देण्याचे आमिष दाखवत एका खासगी कंपनीने महाराष्ट्रातील हजारो सुशिक्षित बेरोजगारांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला. शासकीय भरतीप्रमाणेच पारदर्शक प्रक्रिया असल्याचा देखावा निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५०० ते ७०० रुपयांची फी उकळण्यात आली. महिन्याला २५ हजार रुपयांचा पगार आणि विमानतळावरील झगमगीत नोकरीच्या आमिषाला बळी पडत राज्यभरातील शेकडो विद्यार्थी आज छत्रपती संभाजीनगरच्या उस्मानपुरा येथील एका शाळेत पोहोचले. पण येथे येताच आपली फसवणूक झाल्याचे परीक्षार्थ्यांनी सांगितले.ऑनलाईन अर्ज भरून अभ्यासाची तयारी करून अनेक विद्यार्थी परीक्षेसाठी आले होते. परंतु विद्यार्थ्यांना खरी परिस्थिती लक्षात येताच त्यांच्या पायाखालची वाळू सरकली. कंपनीने सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन संगणकीय परीक्षा होणार असल्याचे सांगितले होते. मात्र, प्रत्यक्ष केंद्रावर एकही संगणक उपलब्ध नव्हता. अधिक विचारणा केली असता परीक्षा घेण्यासाठी आलेली कथित थर्ड पार्टी कंपनीही हात वर करत आम्हाला काहीच माहिती नाही, असे सांगत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी पोलिस देखील दाखल झाले



### परीक्षा घेणारी कंपनी बोगस!

एनआय एव्हिएशन सर्व्हिसेस प्रा. लि. ही परीक्षा घेणारी कंपनी बोगस आहे. सीएसए ग्राउंड स्टाफची परीक्षा होती. त्यामुळे डीजीसीएचे लेटर पाहिजे होते. परंतु यांच्याकडे ते नव्हते. सीटू कंपनीकडेही एनआयएचे लेटर नाही. नोटिफिकेशनवर आयबीपीएसचे नाव आहे. यांनी आयबीपीएसचाही गैरवापर केला, असा आरोप विद्यार्थ्यांनी केला. जानेवारी महिन्यात जाहिरात निघाली होती.

### डीजीसीएची परवानगी नाही, आयबीपीएसचाही गैरवापर

एनआयए एव्हिएशन सर्व्हिसेस प्रा. लि. कडून ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. मात्र परीक्षा घेण्यासाठी आवश्यक डीजीसीएची परवानगी आणि अधिकृत कागदपत्रे दाखवण्यात आली नसल्याचा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. परीक्षेच्या नोटिफिकेशनवर आयबीपीएसचेच् नाव असल्याने विद्यार्थ्यांनी आयबीपीएसच्या नावाच्या गैरवापराबाबतही प्रश्न उपस्थित केले आहेत.

### थर्ड पार्टी म्हणून परीक्षेचे आयोजन

परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ६०० रुपये भरले होते. परंतु जेव्हा परीक्षार्थी परीक्षेला आले, त्यावेळी केंद्रावर सीट नंबर, चेकिंग कर्मचारी आणि आवश्यक व्यवस्था नव्हती. त्यातच एनआयए एव्हिएशन सर्व्हिसेस प्रा. लि. कंपनी केवळ थर्ड पार्टी म्हणून परीक्षा घेत असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. परीक्षार्थ्यांच्या गोंधळानंतर पोलिस दाखल झाले आणि त्यानंतर परीक्षा घेण्यात आली.

# एमबीबीएस चे शिक्षण झाले आता महाग; शुल्कात १७ लाखांपर्यंत वाढ

मुंबई : कमी गुण असतानाही खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमबीबीएसप्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक वाईट बातमी आहे. महाराष्ट्रातील खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील एमबीबीएस शुल्कात पुन्हा वाढ झाली आहे.

२०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी वार्षिक एमबीबीएस शुल्क ७.५० लाख ते १७.१३ लाख रुपये निश्चित करण्यात आले आहे. खासगी एमबीबीएस शुल्कातील या नवीन वाढीमुळे नीट उमेदवारांचे पालक नाराज झाले आहेत. याचा त्यांच्या कुटुंबाच्या शैक्षणिक बजेटवर आणि शैक्षणिक कर्ज योजनांवर मोठा परिणाम झाला आहे.पालक आधीच साडेपाच वर्षांच्या एमबीबीएस अभ्यासक्रमादरम्यान शिक्षण शुल्क, वसतिगृह शुल्क, भोजन, पुस्तके आणि इतर खर्चाची गणना करत आहेत; वार्षिक शुल्कातील अगदी लहान वाढीमुळेही त्यांच्या एकूण खर्चात अनेक लाख रुपयांची भर पडू शकते. महाराष्ट्र शुल्क नियामक प्राधिकरणाने मंजूर केलेल्या नवीन



शुल्क यादीमध्ये राज्यातील १९ खासगी एमबीबीएस महाविद्यालयांचा समावेश आहे.सात वैद्यकीय महाविद्यालयांनी शुल्कात कोणतीही वाढ केलेली नाही. यामध्ये एसीपीएम मेडिकल कॉलेज, एमआयएमएस लातूर, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज, बीकेएल वाळवळकर ग्रामीण मेडिकल कॉलेज आणि एसएसपीएम मेडिकल कॉलेज यांचा समावेश आहे.के. जे. सोमैया मेडिकल कॉलेजची फी ९.७० लाख, तळेगाव येथील एमआयएमईआर मेडिकल कॉलेजने आपली फी ११.०६ लाख केली आहे. नाशिक येथील एसएमबीटी इनस्टट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसने आपली फी १३ लाखांवरून १२.२७ लाख केली आहे.

# मुलांना वाचविताना पित्याचा पाण्यात बुडून मृत्यू

### पाटोदा तालुक्यातील उखांडा तलाव परिसरातील हृदयद्रावक घटना

पाटोदा, दि. ९ ऑगस्ट : पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी उखांडा तलाव परिसरात आलेल्या एका कुटुंबावर शनिवारी (दि. ८) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास काळाने घाला घातला. पाण्यात खेळताना अडचणीत सापडलेल्या आपल्या मुलांना वाचविण्यासाठी पाण्यात उतरलेल्या पित्याचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.





या दुर्घटनेत राजेंद्र वामन निर्मल (वय ४५, मूळ रा. लिंबागणेश, ता. बीड; सध्या रा. बीड) यांचा मृत्यू झाला. राजेंद्र निर्मल हे शनिवारी पत्नी, मेहुणी आणि तीन मुलांसह पर्यटनासाठी उखांडा तलाव परिसरात आले होते.


सायंकाळच्या सुमारास मुले पाण्यात खेळण्यासाठी उतरली. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने काही अंतर पुढे गेल्यानंतर मुले अडचणीत सापडली आणि त्यांनी मदतीसाठी आरडाओरड सुरू केली. मुलांचा जीव धोक्यात असल्याचे लक्षात येताच राजेंद्र निर्मल यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांना वाचविण्यासाठी पाण्यात उडी घेतली.

मात्र, मुलांना वाचविण्याच्या प्रयत्नात राजेंद्र निर्मल स्वतःच पाण्यात बुडाले. या घटनेमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोककळा पसरली आहे.

# बीडमध्ये १५ ऑगस्टला बालकांसाठी मोफत ‘२-डी इको’ तपासणी शिबिर

### मुंबईतील तज्ज्ञ बाल हृदयरोगतज्ज्ञांची उपस्थिती

बीड, प्रतिनिधी : जिल्ह्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील संशयित हृदयरोगग्रस्त बालकांसाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम आणि जिल्हा बाल लवकर निदान व उपचार केंद्राच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट रोजी विशेष ‘२-डी इको’ तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालयातील नवीन माता व बाल रुग्णालयाच्या इमारतीत हे शिबिर होणार आहे.



जिल्ह्यातील शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये आरोग्य विभागाच्या ३९ वैद्यकीय पथकांनी बालकांची आरोग्य तपासणी केली आहे. या तपासणीत हृदयरोगाची शक्यता असलेली सुमारे २५० ते ३०० बालके आढळून आली आहेत. या सर्व बालकांची शिबिरात मोफत ‘२-डी इको’ तपासणी करण्यात येणार आहे.

शिबिरासाठी मुंबईतील प्रसिद्ध बाल हृदयरोगतज्ज्ञांची विशेष नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या उपस्थितीत बालकांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले जाणार आहे. तपासणीदरम्यान हृदयरोगाचे निदान झाल्यास पुढील उपचाराबाबतही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके , जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, डॉ. नागेश चव्हाण, डॉ. सचिन शेकडे, डॉ. एल. आर. तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर होणार आहे. रमेश तांगडे हे शिबिराचे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत.

### मी जीवघेणं उपोषण करू शकतो, तर कुणाचा जीवही घेऊ शकतो, ; मनोज जरांगे

जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आक्रमक भूमिका घेणारे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या एका वक्तव्यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी आपण कोणत्याही टोकाला जाऊ शकतो, अशा आशयाचे विधान जरांगे यांनी केल्याचे समोर आले आहे. मी मराठा आरक्षणासाठी जीवघेणं उपोषण करू शकतो, तर कुणाचा जीवही घेऊ शकतो, असे विधान मनोज जरांगे यांनी केल्याने खळबळ उडाली आहे. जरांगेंचा हा इशारा नेमका कोणाला होता, याबाबत उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आरक्षणाच्या आंदोलनाची दिशा आणि त्यामागील आक्रमक भूमिका यावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.



मराठा समाजाला आरक्षण मिळावे, ही मागणी घेऊन मनोज जरांगे यांनी यापूर्वीही अनेकदा उपोषण आणि आंदोलन केले आहे. सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी त्यांची सातत्याने भूमिका राहिली आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून त्यांनी सरकारवर अनेकदा तीव्र शब्दांत टीका केली आहे.

# पवित्र पोर्टलवरील तांत्रिक अडचणी दूर करून शिक्षक भरतीची मुदत वाढवा

### ब्राइट सोशल फाउंडेशनची शिक्षण आयुक्तांकडे ३ ते ७ दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी

बीड, दि. ९ ऑगस्ट : महाराष्ट्रातील शिक्षक भरती प्रक्रियेत पात्र उमेदवारांकडून विविध पदांसाठी पसंतीक्रम भरणे व लॉक करण्याची प्रक्रिया पवित्र पोर्टलद्वारे सुरू आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पोर्टलवर मोठ्या प्रमाणात तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने उमेदवारांना उरपवळवरींश डेसळप, उपलब्ध पदांची माहिती पाहणे, पसंतीक्रम भरणे तसेच झीशषशीशपलश डेलज्ञ करण्यास अडथळे येत आहेत. त्यामुळे पात्र उमेदवारांना भरती प्रक्रियेतील संधी गमावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



या पार्श्वभूमीवर ब्राइट सोशल फाउंडेशन, बीड यांनी महाराष्ट्राच्या शिक्षण आयुक्तांकडे निवेदन सादर करून पवित्र पोर्टलवरील तांत्रिक अडचणी तातडीने दूर कराव्यात आणि पसंतीक्रम भरणे व लॉक करण्यासाठी किमान ३ ते ७ दिवसांची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली आहे.

पोर्टलवरील तांत्रिक अडचणी या उमेदवारांच्या नियंत्रणाबाहेर असल्याने केवळ तांत्रिक कारणामुळे कोणत्याही पात्र उमेदवाराला शिक्षक भरती प्रक्रियेपासून वंचित राहावे लागू नये, अशी भूमिका फाउंडेशनने घेतली आहे. मुदतवाढीची अधिकृत घोषणा करून राज्यातील सर्व पात्र उमेदवारांना समान संधी उपलब्ध करून द्यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच पवित्र पोर्टलवरील तांत्रिक समस्या तातडीने दूर करून डेसळप, झीशषशीशपलश ऋळश्रश्रळपस आणि झीशषशीशपलश डेलज्ञळपस या सुविधा सुरळीत कराव्यात, तांत्रिक कारणांमुळे पसंतीक्रम लॉक करता न आलेल्या उमेदवारांना विशेष संधी द्यावी आणि मुदतवाढीबाबतची अधिकृत सूचना पवित्र पोर्टल तसेच संबंधित विभागामार्फत प्रसिद्ध करावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

# मेंदू निरोगी ठेवण्यासाठी - डॉ.जगदीश टेकाळे

बीड : मेंदुचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरेशी आणि दर्जेदार झोप घेणे आवश्यक आहे. प्रौढ व्यक्तींनी दररोज किमान सात ते आठ तास झोप घेणे आवश्यक आहे. झोपेच्या काळात मेंदूमध्ये दिवसभर साचलेले चयापचयातील अपायकारक पदार्थ बाहेर टाकण्याची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे घडते. स्मरणशक्ती मजबूत करणे, नवीन माहितीचे दीर्घकालीन संचयन करणे आणि मेंदूच्या पेशींना विश्रांती देणे ही महत्त्वाची कामे झोपेतच होतात. सातत्याने अपुरी झोप घेतल्यास एकाग्रता कमी होणे, निर्णयक्षमता बिघडणे आणि दीर्घकाळात स्मृतिभ्रंशासारख्या विकारांचा धोका वाढू शकतो.

सकाळी दहा ते पंधरा मिनिटे नैसर्गिक सूर्यप्रकाशात राहिल्याने शरीरातील जैविक घड्याळ संतुलित राहण्यास मदत होते. यामुळे मेलॅटोनीन आणि इतर जैविक संप्रेरकांचे संतुलन सुधारते, मन प्रसन्न राहते आणि रात्रीची झोप अधिक चांगली लागते. नियमित सूर्यप्रकाशामुळे व्हिटॅमिन डीची निर्मितीही होते, ज्याचा अप्रत्यक्ष फायदा मेंदूच्या आरोग्यालाही होतो.

नियमित व्यायाम हा मेंदूसाठी औषधासारखा मानला जातो. विशेषतः स्क्वॅटस्सारखे पायांच्या मोठ्या स्नायूंना कार्यरत ठेवणारे व्यायाम रक्ताभिसरण सुधारतात. त्यामुळे मेंदूपर्यंत प्राणवायू आणि पोषक घटकांचा पुरवठा अधिक प्रभावीपणे होतो.वजन उचलण्याचे किंवा स्नायू बळकट करणारे व्यायाम केल्याने शरीरात काही जैविक घटक तयार होतात, जे मेंदूतील मज्जापेशींच्या कार्यक्षमतेला चालना देतात. संशोधनानुसार नियमित शक्तिवर्धक व्यायामामुळे स्मरणशक्ती, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता आणि संज्ञानात्मक कार्यक्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते.हेही लक्षात ठेवा व्हिटॅमिन बी-१२, ओमेगा-३ स्निग्धाम्ले फोलेट, लोह आणि व्हिटॅमिन डी यांची कमतरता मेंदूच्या कार्यक्षमतेवर परिणाम करू शकते. मानवी मेंदू हा सामाजिक संवादासाठी बनलेला आहे. त्यामुळे कुटुंबीय, मित्र आणि समाजाशी नियमित संवाद ठेवणे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. एकाकीपणा, सामाजिक अलिप्तता आणि दीर्घकाळ एकटे राहणे यामुळे नैराश्य, चिंता आणि स्मरणशक्ती कमी होण्याचा धोका वाढू शकतो. सबब रोज एखाद्या व्यक्तीशी मनमोकळा संवाद साधणे, मित्रपरिवारात सहभागी होणे किंवा सामाजिक उपक्रमांमध्ये भाग घेणे मेंदूला सक्रिय ठेवते. नवीन गोष्टी शिकण्याची सवय मेंदूला सतत कार्यरत ठेवते. नवीन भाषा शिकणे, एखादे वाद्य वाजवणे, चित्रकला, बुद्धिबळ, लेखन, वाचन किंवा कोणतीही नवीन कला आत्मसात करणे यामुळे मेंदूमध्ये नवीन मज्जासंयोग तयार होण्यास मदत होते.



सततचा ताण शरीरातील कोर्टिसोल या संप्रेरकाची पातळी वाढवतो. दीर्घकाळ कोर्टिसोल वाढलेले राहिल्यास स्मरणशक्ती, एकाग्रता आणि निर्णयक्षमता यांवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे ताण नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. ध्यान, मौन किंवा श्वसनाचे व्यायाम हे मेंदूला विश्रांती देणारे प्रभावी उपाय आहेत. दररोज दहा मिनिटे ध्यान, प्राणायाम किंवा शांत बसून श्वासावर लक्ष केंद्रित केल्याने मन स्थिर राहते, तणाव कमी होतो आणि भावनिक संतुलन सुधारते. काही संशोधनांमध्ये नियमित ध्यानामुळे मेंदूच्या विचार आणि स्मरणशक्तीशी संबंधित भागांच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.

मेंदू हे संपूर्ण शरीराचा नियंत्रणकेंद्र आहे. विचार करणे, निर्णय घेणे, आठवणी साठवणे, भावना व्यक्त करणे, शरीराच्या हालचाली नियंत्रित करणे आणि दैनंदिन जीवनातील प्रत्येक कृतीचे नियोजन करणे ही सर्व कामे मेंदू करत असतो. त्यामुळे मेंदूचे आरोग्य चांगले असेल तर शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यही उत्तम राहते.

असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

### मुकुंदनगर मध्ये जीवघेण्या हल्ल्यात महापालिका कर्मचारी

# धीरज परदेशींचा मृत्यू,कापड बाजार परिसरात तणाव

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना

महापालिका कंत्राटदार संस्थेच्या कर्मचारी धीरजसिंग परदेशी यांना करण्यात आलेल्या मारहाणीत मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर कापड बाजार परिसरात तणाव निर्माण झाला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

कुटुंबाचा आधार हिरावला! मुकुंदनगर हल्ल्यात धीरज परदेशी यांचा दुर्दैवी अंत

अहिल्यानगरच्या मुकुंदनगर परिसरात काही दिवसांपूर्वी झालेल्या प्राणघातक हल्ल्यात गंभीर जखमी झालेले महापालिकेच्या कंत्राटी संस्थेचे कर्मचारी धीरज कचरुसिंग परदेशी यांचे उपचारादरम्यान निधन झाले.पथदिव्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना १० ते १५ जणांच्या टोळक्याने लोखंडी दांडक्यांनी त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. गंभीर जखमी अवस्थेत त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. या घटनेप्रकरणी महापालिकेतील वायरमन युनूस शेख याच्यासह अन्य आरोपींविरुद्ध



गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.धीरज परदेशी यांच्या निधनाची बातमी समोर येताच रुग्णालयाबाहेर नातेवाईक, नागरिक आणि समर्थकांची मोठी गर्दी झाली. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.या प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या हल्ल्यामागचं नेमकं कारण काय? तपासातून आता काय समोर येतं, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे